डॉ. नितीन मोरे

# शाणपट्टी



# शाणपट्टी

## (विनोदी लेख)

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# शाणपट्टी

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २५ फेब्रुवारी २०२४

©esahity Pratishthan®2024


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# शाणपट्टी

डॉ. नितीन मोरे

# प्रस्तावना

शाणपट्टी!

संत सांगून गेलेत, 'मी' पण सोडा.

पण मी म्हणतो 'मी' पणा सोडला तर माझे म्हणून असे राहिल काय?

मी मी म्हणणाऱ्यांना तो सोडता येत नाही.

तेव्हा सर्वात महत्वाचा तो मी.

आणि मीच! माझ्या गुणदोष नि वैशिष्ट्यांसह!

तेव्हा हा 'मी'च सर्वात महत्वाचा असताना मी 'मी पणा' सोडावा कशाला?

तेव्हा माझ्या 'मी' पणाचा शोध घेण्याचा हा प्रपंच.

माझ्या 'असा मी असामी'च्या शोधात माझाच आतला आवाज मला सांगत असतो 'असा कसा मी' ते! कुणाला ते इन्ट्रोस्पेक्शन वाटेल.. तर कुणाला अजून काही. मुळात ही शाणपट्टीची सवय आधीपासूनची. ती कशी जाणार? तेव्हा स्वत:च स्वत:ला शहाणा समजून स्वत:कडेच पाहण्याचा हा प्रयत्न. किती शहाणपणाचा आहे ते वाचकानीच ठरवावे.


आपण मात्र ही शाणपट्टी जोवर उपरोधास अपराध मानले जात नाही तोवर करावयास हरकत नसावी!

डॉ.नितीन मोरे.

# शाणपट्टी

## अनुक्रम


१. माझा हसवण्याचा धंदा
२. माझी व्यवच्छेदक लक्षणे
३. मी आणि माझे मोठेपण
४. मी माणूस कसा झालो?
५. माझ्या शाणपट्टीचे मोती
६. शहामृग
७. मी मोठा झालो
८. आमची अर्थशास्त्रीय विद्वत्ता
९. सामर्थ्य आहे बडबडीचे
१०. माझे होयबा धोरण
११. सश्रद्ध मी अंधश्रद्ध मी
१२. नरो वा कुंजरो वा
१३. आत्मचरित्र: एक डझनावारी मुद्देसूद चिंतन!



# *माझा हसवण्याचा धंदा!*



त्या दिवशीची गोष्ट. भल्या पहाटे दरवाजावरची घंटी वाजली. सवयीप्रमाणे अर्धोन्मिलीत डोळे नि एका हातात भांडे घेऊन मी दार उघडले. भांडे पुढे केले, तर दरवाजा धाडदिशी उघडून पोलिस आत शिरले. कशासाठी असावेत?

मी कालच रात्री ज्वलज्जहाल, अगदी लाव्हारसपूर्ण विद्रोही कविता लिहिलेली वही समोरच टेबलावर पडलेली. ती कविता इतकी ज्वालाग्राही की एकेक शब्द ही पेट घेतील की काय असे वाटावे. वर्तमान व्यवस्थेस नि विद्यमान सरकारास खडसून जाब विचारणारी कविता.. माझे डोळे खाडकन उघडले. सा◌ॅक्रेटिसासारखा माझा अंत येणार की काय?

माझ्या टेबलावरची उघडी नि बंद सारी पुस्तके नि वह्या एका हातात नि दुसऱ्या हाताने माझे बखोट पकडून मला खाली नेले गेले. अशा वेळी बायकोचा निरोप घेत तिला चार उपदेशाचे शब्द ऐकवायचे, जे पुढील पिढ्यांस मार्गदर्शक व्हावेत अशी

एक मोठ्या माणसांची पद्धत आहे.. खरंतर बायको ते ऐकेल न ऐकेल पण आपण तर सांगावेत.. पण पोलिस तो चान्स देतील तर..

मग पाठोपाठ सायरनचा आवाज. माझं बखोट काय पोलिस सोडायला तयार नाहीत. तुकोबाच्या अभंगासारख्या माझ्या कवितांच्या वह्या पण तरून जातील? धरलेल्या बखोटीत माझा श्वास अटकतोय.. परत सायरन वाजल्याचा आवाज..

पाठोपाठ त्या वरताण बायकोचा आवाज.. 'काय मेली ढाराढूर झोप ती कुंभकर्णासारखी. उठा. दूध घ्या..'

मी एकाएकी उठतो. बाहेर पोलिस असतील अशी मनात भीती असली तरी घरातील बायकोरूपी पोलिसाची दहशत त्याहून जास्त. दुधाचे भांडे घेऊन दरवाजात उभा मी. समोर 'मिल्का'सिंग.. म्हणजे प्रत्यक्ष दूधवाला! खरोखरचे दूध घेऊन परततो.. तेव्हा ध्यानात येते.. पहिले ते स्वप्न नि दूधवाला हे सत्य!

खरेतर ती कविता लिहितानाच वाटत होतं मला, शब्दांचे तापमान कमी करावे, जहालपणात थोडा मवाळपणा कालवावा म्हणजे विशेष कालवा होणार नाही.. मग मी बाजूच्या वहीतील कविता वाचतो.. सुटकेचा निश्वास टाकत म्हणतो.. होय! सवयीप्रमाणे मी सांकेतिकच भाषा वापरलीय. इसापनीतीसारखी रूपके नि 'लेकी बोले सुने लागे' हा बाणा! कोणी अंगाला चिटकवून घ्या किंवा नाही. चा ॅइस इज देअर्स! मी डायरेक्ट काय कोणाही सत्ताधीशाबद्दल काहीच म्हटले नाहीए! सेफ अगदी! इंग्रजीत 'एस ओ एस' म्हणजे सेव्ह अवर सोल्स असेलही, पण माझ्यासाठी 'एस ओ एस' म्हणजे सेव्ह अवर स्कीन! स्कीन सलामत तर पुढे कित्येक गोष्टी हजार!

माझे हे वैशिष्ट्यच म्हणा ना!

गेली कित्येक वर्षे मी कथा, कविता लिहितोय. आजूबाजूच्या अन्यायाने मी मनातल्या मनात पेटून उठतो. सत्ताधीशांचा मदमत्त कारभार दिसतो मला. कधी वाटतं उलथवून टाकावी सारी व्यवस्था. कधी सरकार दरबारास हडसून खडसून जाब विचारावा. पण मनातील शब्द बाहेर येताना त्यांवर कधी शर्करा अवगुंठित होते, तर कधी उपरोधास्त्रात मूळ प्रश्न लपवून उपस्थित केला जातो. हे काही खरे भाषा लालित्य नव्हे. खरी काळजी हीच की कुणाच्या शेपटावर पाय न पडो नि ती पोलिसांची धाड माझ्यावर न पडो.

मी असाच आहे..

आतून विद्रोही सिंह पण बाहेरून भित्रा ससा. देव पण काय चेष्टा करतो बघा. पृथ्वीवर धाडताना त्याने संवेदनशील मन तर दिलं. अन्यायाची चीड वाटणारा मनाचा एक कप्पा दिला. कुणाकुणास प्रश्न विचारून भंडावून सोडवायला ते प्रश्न उपस्थित करण्याची विचारशक्ती दिली.. कविता सुचण्यासाठी कल्पनाशक्ती नि ती गरज भागेल अशी शब्दसंपदा मिळाली. भोवताली सर्व बघण्याची, समजण्याची दृष्टी किंवा नजर दिली.

पण या असल्या मेंदूबरोबर छातीत बसवले गेलेय ते भित्र्या सशाचे काळीज. नुसता कुणा शक्तिमानावर प्रश्न उपस्थित केल्यावर तो शक्तिशाली बलवान राजकारणी माझ्यावर हल्ला चढवतोय.. मी आभाळ पडलं, आभाळ पडलं म्हणून

सशासारखा सैरावैरा धावतोय. जीव बचावण्यासाठी. मी माझ्या बिळात शिरतो. थोडावेळ गपचुप. मग त्या राजकारण्याच्या फौजा गेल्याची खात्री करून मी डोकावून बाहेर पाहातो नि नवीन कविता लिहायला घेतो. माझ्यातील सशाचे भित्रे काळीज मला नेहमीच सबुरीचा 'रेड अॅलर्ट' देतेय.. हे सारे मला दिसते. दिसते पण त्यावर इलाज नाही. निरूपाय आहे, कारण मी भीरू आहे. पण चूक माझी नाही, त्या निर्मिकाने माझ्या देहाच्या मा ॅडेलात फिट केलेल्या सशाच्या काळजाची आहे!

मला नाही का वाटत मी परखड टीका करावी? नावानिशी कोणावर तुटून पडावे? दोन चार शाब्दिक रट्टे हाणावे. मला जे वाटते त्यासाठी हातचे न राखता लिहित सुटावे. कुणी मला निर्भीड म्हणावे, कोणी निर्भय म्हणावे. कुणी माझ्या ताठ कण्याचे गुणगान करावे. कुणी मला आदर्श मानून माझे अनुकरण करत रहावे. माझ्या आदर्श अशा लिखाणाचा आदर्श डोळयांसमोर ठेऊन पिढ्या घडाव्यात. माझा आदर्श वारसा चालवणारे कुणी असावेत.. समाजात घुसळण घडावी. माझे लिखाण त्यासाठी कारण असावे. मी पथदर्शकाची भूमिका बजावावी. मी चुकीस चूक व जे योग्य त्यास योग्यच म्हणावे, ते ही नावानिशी नि हातचे राखून न ठेवता. माझ्या अशा लिहिण्याने कुणाचे काय बिनसेल याची तमा मला नसावी.. खरेतर त्या शक्तिमानांचे जे काही बिनसेल त्यामुळे माझे जे बिनसवण्याचा प्रयत्न होईल त्याची तमा मला नसावी. डोक्यावर कफन बांधूनच मी सारे करत असावे.

पण नाही!

डोक्यातील मेंदूत स्वार झालेल्या सिंहास काळजातील भित्रा ससा लगाम घालत सुटतो. त्या सिंहास डरकाळी तर फोडता येते पण एखाद्या गाडीस सायलेन्सर

लावल्यास जसा आवाज येईल तितपत आवाज फुटतो त्याचा. सिंहाची तयारी पूर्ण आहे, पण काळजातला ससा त्यास हल्ला करू देईल तर ना! म्हटले ना मी, चूक त्या काळीज स्थित सशाची आहे. अगदी सिंहास लगाम घालण्याइतक्या ताकदीचा आहे तो ससा. मग जहाल शब्द मवाळ होतात. एल्गारसाठी उगारलेली शेपूट अचानक खाली वळते. लाव्हारसाऐवजी शीतल जलाचा शिडकावा होतो. शब्द शब्द जपून वापरला जातो.

पण या सर्वात मी इमान सोडलेले नाही अजून. काळीज सशाचे असले तरी ते अजून इमानी आहे. शब्द जपून वापरले तरी 'जो तुमको हो पसंद वही बात' सांगत नाही मी. भाषेच्या लाल भडक रंगात भले मी पाणी घालून गुलाबी बनवेन तीस, आशय थोडा पातळ होईल, मी सांकेतिक 'नरो वा कुंजरोवा' भूमिका घेईन.. 'त्यांच्या' मुळावर घाव घालणं जमणार नाही मला, मी फांद्याच छाटत राहिन.. आणि माझ्या वकुबानुसार मी लढा दिला म्हणून माझीच पाठ थोपटत राहिन! माझ्यातला 'स्थितीशील' मी याहून जास्त करू देणार नाही मला. मी चरफडेन, चिडेन पण अन्याय्य राज्याधीशांच्या विरोधात थेट उभा राहणार नाही. अगदी 'ठेविले अनंते तैसेचि' राहण्याचा स्थितप्रज्ञतेचा उपदेश या देशी अमंलात आणावा असे वाटणार नाही नि पटणार नाही मला. येथे आमचा 'अनंत' म्हणजे सर्वशक्तिमान सत्ताधारी सत्ताधीश. पण म्हणून अगदी शड्डू ठोकून मी रणांगणात उतरेन असे नाहीच. जमेल तितके बाण कशाकशाच्या आडून सोडत नामानिराळा राहिन!

म्हणजे मी काय करणार?

उगाच कुणाला जीभ दाखव, वेडावून दाखव, कुणाच्या मूर्खपणा हसून दाखव वगैरे विनोदी चाळे करत राहिन मी. मी मग स्वत:ला विनोदी लेखक म्हणवून घेईन. इतरांवर हसण्यासाठी वाचकांस मजकूर पुरवीन. विनोदाच्या नि उपरोधाच्या आवरणाखाली माझे अभिव्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवेन. डायरेक्ट कोणास मी काही बोलू शकत नाही. बोललो नि ते आले दार ठोठावत मला घ्यायला.. कारागृहाच्या भिंती आड राहून लढण्याची माझ्यात हिंमत नाही. जुलमाविरूद्ध आवाज उठवावासा वाटेल पण माझा आवाज तो काळजातला ससा नियंत्रित करतो. तो काही इतरांस ऐकू यावे अशा आवाजात बोलण्यासाठी परवानगी देणार नाही..

म्हणजे माझा मार्ग मलाच सापडलाय!

अंतरीच्या नाना कळा लपवण्यासाठी बावळा वेश आणि त्याहून ही सोपा मार्ग म्हणजे विदूषकी आवेश! ह्या विदूषकी टोपी खाली खरंतर दडलंय खूप काही.. पण ते बाहेर दिसून चालायचे नाही. दिसले तर 'त्यांची' माणसं येतील. नि मग? पुढचे परिणाम भोगण्याची इच्छा, कुवत नि हिंमत ह्या सशासारख्या काळजात नाही. त्यापेक्षा उपरोध, रूपक नि विनोदाचा कॅमोफ्लाज बरा!

.. त्यामुळे चालू आहे आणि पुढेही चालू राहिल असाच, हा माझा हसण्या नि हसवण्याचा धंदा!

# *माझी व्यवच्छेदक लक्षणे*

तसा मी दुरूनही उठून दिसेन असा आहे.

म्हणजे बसलेला असेन तरी चारचौघांत उठून दिसण्यासाठी नकटे नाक पुरेसे किंवा माझ्या पाठीचा बाक ही पुरेसा ठरतो.

बोलताना माझा नाकातला आवाज कोणाचेही लक्ष वेधून घेतो.

पण बाह्यरूपरंगावरून माझी ओळख पटवणे मला पटत नाही..

त्यासाठी माझे अंगभूत गुण पाहणेच योग्य.

कारण 'का रे भुललासी वरलिया सोंगा' .. यापेक्षा अंतरंगातील रंगच महत्वाचे नाहीत का?

पण..

मी माझे गुण स्वत:च सांगावेत का?

का नाही?

आपले राज्यकर्ते आपणच इतरांपेक्षा किती चांगले हे सांगत फिरत असतात. तिथे विनय आडवा येत नसेल तर व्यक्तिगत पातळीवर मी बढाया मारणे हे अयोग्य कसे ठरावे? अर्थात मला बढाया मारण्याची तशी सवय नाही. जे सत्यच आहे ते कथन करावे एवढेच माझे म्हणणे आहे. त्यामुळे त्याबद्दल विशेष वाईट वाटून घेणे किंवा अतिविनयाने खाली मुंडी घालून पाताळ धुंडत त्या विनयाचेच अविनय प्रदर्शन करणे असंयुक्तिक ठरावे. असो.

प्रस्तावना पुरे!

या इतक्या प्रस्तावनेनंतर मी माझी गुणपत्रिका लिहून सादर केली की माझी ओळख पूर्णपणे पटावी..

***

मी कोण आहे?

को हम? कौन है हम?

मी 'मी' आहे..

अभिमानी!

किंवा गर्विष्ठ म्हणा ना!

मला माझ्या देशाचा अभिमान आहे.

मला माझ्या राज्याचा अभिमान आहे.

मला माझ्या शहराचा अभिमान आहे.

मला माझ्या गावाचा अभिमान आहे.

मला माझ्या गल्लीचा अभिमान आहे.

ज्या चाळ वजा इमारतीत मी राहतो त्या चाळीचा मला अभिमान आहे.

त्या चाळीच्या माझ्या मजल्याचा मजला अभिमान आहे.

मला माझ्या जातीचा अभिमान आहे. पोटजातीचा ही पोट अभिमान आहे.

मला माझ्या पंथाचा अभिमान आहे.

मला माझ्या विविध आध्यात्मिक गुरूचा अभिमान आहे.

मला माझ्या भाषेचा अभिमान आहे. माझ्या बोलीचा ही अभिमान आहे.

मला माझ्याशी जोडलेल्या प्रत्येक बाबीचा अभिमान आहे.

किंबहुना मला या सर्वांबद्दल गर्व आहे.

या गोष्टींचा मला गर्व वाटतो याबद्दल मला अभिमान आहे.

या अभिमान वाटण्याबद्दलही मला गर्व आहे.

म्हणून मी गर्विष्ठ अभिमानी आहे.

किंवा अभिमानी गर्विष्ठ आहे.

शर्मिष्ठा वगैरे नाव असते मुलींचे..

मी मुलगी असतो तर माझे नाव गर्विष्ठा ठेवता आले असते.

ते असो.

पण या सर्वांमुळे मी महान व इतर लहान याबद्दल माझी खात्री आहे.

माझा मोठेपणा मी ओळखून आहे.

फक्त मी तो इतरांच्या माहितीसाठी.. किंवा जनहित में जारी.. असे म्हणत सांगत असतो.

इतक्या प्राथमिक ओळखीनंतर माझे इतरही गुण पाहावयास हवेत.

मला सत्य कथन करणे सदैव आवडते.

फक्त आपल्याला आवडतील अशाच गोष्टी सदैव करणे मात्र मला पटत नाही.

मी इतरेजनांचा सदैव आदर करतो.

फक्त इतरेजनांतील सारे हे माझ्याच पातळीवरचे असावेत असा माझा कटाक्ष असतो.

मी त्या कटाक्षासाठी स्पेशल चष्मा वापरत असतो.

माझ्या चष्म्याचा नंबर सदा वाढत राहतो म्हणून मी तो कित्येकदा उलटा वापरतो.

माझ्या उलट्या चष्म्यामुळे मी कित्येकदा उलट्या डोक्याचा म्हणवला जातो.

पण त्यास ही मी उलट्या चष्म्यानेच पाहत असतो.

मला 'सत्यासत्यास मन ग्वाही' करावयास आवडते.

तरीही लोकशाही मानत असल्याने मी बहुमतास मानतो.

'ज्याच्या हाती काठी तो ती जगावर उगारी' यावर माझा दृढ विश्वास आहे.

बहुमताइतकाच बहुशक्तीवर माझा विश्वास आहे.

सर्वात ताकदवानच या जगात तरून जातो नि पुढे जातो या शाश्वत सत्यावर माझा विश्वास आहे.

त्यामुळे बहुमताची ताकद ओळखून मी बहुमताबरोबरच नेहमी राहतो.

अल्पमतातील लोकांचा मी यथामती तिरस्कार करतो.

बहुमताच्या बळावर हे सांगण्यास मी घाबरत नाही.

कारण मी तसा धाडसी, साहसी व शूर आहे.

आणि ज्याच्या हाती ससा तो पारधी या तत्वावर माझा विश्वास आहे.

त्यामुळे ससा पकडणारा पारधी होण्यासाठी मी ऐन तारूण्यापासून प्रयत्नात आहे.

मी पारधी झालो तर आजूबाजूस ससेच असतील याचीही मी काळजी घेत असतो.

वाघ सिंहादी वन्य जीवांचे महत्व मी जाणून असल्याने पारध फक्त सशासारख्याच जिवांची करावी असे मी मानतो व तेच आजवर करत आलो आहे.

वन्यप्राण्यांचे या जगातील महत्व मी जाणून आहे.

मी जे मानतो ते बोलतो, जे बोलतो ते करतो..

हे माझे खास लक्षण आहे.

आणि मी अबोल असल्याचे कौतुक कित्येक जणांच्या तोंडून ऐकले आहे.

माझा विश्वास माणसाच्या अंगभूत शहाणपणावर आहे.

या शहाणपणावरच जग तरून जाते असा माझा विश्वास आहे.

माझ्याठायी असा शहाणपणा ओतप्रोत भरून राहिल्याने माझा हे जग तारून नेण्यात विशेष सहभाग आहे.

याचा ही मला अभिमान आहे.

या अभिमानाबद्दल मला गर्व आहे.

शहाणपणा बद्दलचे सत्य मला मनापासून पटलेले आहे.

आणि सत्यमेव जयते हे ब्रीद ही मला पटलेले आहे.

सत्याचाच विजय सरतेशेवटी होतो हे एक सत्य मी मानतो.

सत्यावर माझी गाढ श्रद्धा आहे.

आणि असत्यामुळेच सत्यास वेगळी झळाळी किंवा किंमत आहे हे मी ओळखून आहे.

ती किंमत वाढावी याकरता मी सदा प्रयत्नशील असतो.

श्रद्धा हे माझे अधिकच व्यवच्छेदक लक्षण आहे. कुणी त्यास आंधळेपणाने अंधश्रद्धा म्हणो.. मी त्याकडे हे भगवान! त्यांना क्षमा कर. ते काय म्हणतात हे त्यांचे त्यांना समजत नाही असे म्हणत त्यांच्या नावे पाणी सोडतो.

सर्वच कर्मकांडांवर माझा अतीव विश्वास आहे.

परमेश्वर नि मर्त्य मानव यातील दुवा असणाऱ्या सर्व साधू, बाबा, बुवा, महंत, देवी, माँ वगैरेंबद्दल मला अतीव श्रद्धा आहे.

याबद्दल कोणी नकारात्मक बोललेले मला खपत नाही.

माझ्या श्रद्धेआड कुणी आलेले मला खपत नाही.

कारण माझ्या श्रद्धांचा मला अभिमान आहे.

त्या अभिमानाबद्दल मला गर्व देखील आहे.

जात नि धर्म हे माझे अभिमान बिंदू आहेत.

त्याबद्दलही कोणी बोललेले मला खपत नाही.

मला न खपणाऱ्या बाबी वगळल्या बाकी कोणी कशावर बोलावे याबद्दल व्यक्ती व तिच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल माझा आक्षेप नसतो.

मी स्वत: अत्यंत उद्यमशील आहे.

मी इतरांच्या टीकेस जुमानत नाही.

त्यामुळे त्यांनी मी नसते उद्योग करतो असे म्हटले तरी मी तिकडे दुर्लक्ष करतो.

उद्योगामुळेच माणसाची किंमत वाढते यावर माझी श्रद्धा आहे.

कुणी यास उपद्रवमूल्य म्हटले तरी मी याकडेही दुर्लक्ष करतो.

असा मी कित्येक गोष्टींकडे दुर्लक्ष करीत असतो.

डोळेझाक करणे किंवा कानाडोळा करणे हे वाक्प्रचार समजावून सांगण्यास उदाहरण पुरवणे ही माझी माझ्या मायभाषेस देणगी आहे असे माझे मानणे आहे.

माझ्या भाषेचा मला अभिमान आहे.

गर्व देखील आहे.

इतका की तिचा कितीही व्याकरणदृष्ट्या सदोष वापर झाला तरी ही मला तिचा अभिमान वाटतो. आपल्या मातेबद्दल ती कशीही असली तरी प्रेम वाटतेच ना?

शेवटी मी मी आहे.

किती नि काय काय सांगू माझ्याबद्दल?

सांगताना शब्द पुरत नाहीत.

मुद्दे पुरत नाहीत.

अभिमानाने ऊर भरून येतो.

गर्वाने मान ताठ होते.

त्यात कुणी 'गर्वाचे घर खाली' म्हणून फुगलेल्या फुग्यास टाचणी टोचतो..

एखाद्याचे चांगले लोकांना बघवत नाही.

माझ्यासारख्या बहुगुणी नररत्नाबद्दल तर असूयेने कित्येक जण हे करत असणार..

खात्री आहे माझी.

पण

तो स्वत:च्या गुणांबद्दल अभिमानी, बाक आलेल्या पाठीस न जुमानता शक्य तेवढी मान ताठ करून चालणारा, इतरांकडे पाहात नकटे नाक मुरडणारा कुणी तुम्हाला दिसला ना की समजा..

तो मी..

तोच मी!

किंवा खरेतर तो मीच!

अजून ही ओळख विचारत असाल तर..

-इतक्या व्यवच्छेदक लक्षणानंतर ओळख पटणे कठीण जाऊ नये!

# *मी आणि माझे मोठेपण*

मला आठवतंय..

लहान होतो मी तेव्हा. मला सारे सारखेच वाटायचे.

सलमान नि उस्मान.

रॉबर्ट नि थॉमस.

कांबळे, सोनकांबळे नि चंदनशिवे.

भट, जोशी नि फडके.

आमच्या शाळेतला फाटक्या कपड्यातला माझा मित्र नि स्वत:च्या गाडीतून येणारा माझा मित्र ही.

माझं मन तसं अगदीच इममॅच्युअर होतं तेव्हा.

कसलीच व्यवहाराची जाण नाही.

कसलीच सत्याची जाणीव नाही.

मी तेव्हा मिळून मिसळून काय रहायचो.

माझ्या घरात माझ्या दोन भावांबरोबर सर्व वाटून काय खायचो.

माझ्या आधी मला अन्यांचे भलं व्हावं असं काय वाटायचं.

स्वत: तगून राहणं ही मानवाची आदिम प्रेरणा.

तीच नव्हती त्या वयात.

मला सारंच कसं छान दिसायचं.

सारंच गोड गुलाबी.

सारंच शांत शांत.

खरं सांगतो, आज लाजायला होतं त्याकडे पाहून.

स्वत्वाची इतकीही जाण नसावी मला?

व्यवहार इतकाही न कळावा?

स्वत:च्या पोळीवर जास्तीत जास्त तूप ओढता येऊ नये?

नसेल ओढता येत, पण मी ते तूप इतरांस द्यावे?

ते ही आग्रह कर करून?

मला उच्च नीच कशाची ही कल्पना नसावी?

स्व हाताची पाच बोटेही सारखी नसताना मला सारे इतरेजन समान वाटावेत?

इतके मी सत्यापासून दूर असावे?

पण नाही.

सारे झुगारून मी मोठा झालोच.

आता मी आणि मला आणि माझे ह्याच माझ्या प्रेरणा.

मला आता पोळीवर तूप ओढून घ्यायला जमायला लागलंय.

ते ही साजूक तूप!

समोरचा कोरडी पोळी खातोय.. खाऊ देत! माझ्या पोळीवर पचपचीत तूप घालून घेतल्याने ती अधिक चविष्ट होते!

आणि पाचक ही!

आणि ते जर मी हिसकावून घेतलं असेल तर जास्त समाधान देते मला!

मला आता माणसामाणसांतला फरक समजायला लागलाय.

सारी माणसं एकच नाहीत.

इतकंच काय सारे देव ही एक नाहीत.

हाताचीच काय, पायाची ही बोटे एकसारखी नाहीत.

अगदीच काही जुळी सोडली तर एकासारखा दुसरा माणूस नाही.

मी इतरांहून किती श्रेष्ठ याची मला आता जाणीव झालीय.

आणि या जाणिवेलाच जाणतेपण म्हणतात हे ही जाणलंय मी!

माझ्या जात, धर्म, पंथ, गाव, गल्ली, रस्ता वगैरे वगैरेमुळे मी, किंबहुना मीच किती श्रेष्ठ हे कळायला वेळ लागला असेल मला.

पण मोठं व्हायचं तर त्याला वेळ लागणारच.

काही जण मात्र हे लवकर शिकतात.

म्हणजे काय ना, उगाच समता, बंधुता वगैरे वगैरे शिकवणुकींच्या नादाला लागत आपले मोठे होणे उगाच प्रलंबित होऊ देत नाहीत.. माझ्यासारखं.

मला आता समाजधुरीणाचं पटायला लागलंय.

सामाजिक जीवनात उच्चनीचते शिवाय समाज नाही.

आणि माझ्याशिवाय कुणीच मोठा नाही.

'माझ्या'त मग मी माझ्या जातिधर्माचे वगैरे वगैरे समाविष्ट करतो. कारण धुरीण सांगून गेलेत.. सामर्थ्य आहे एकीचे!

मी नि माझे सम'विचारी' एक होतो नि 'त्यांचा' विरोध करतो!

व्यक्तिगत जीवनात मी, मला, माझं या शिवाय आदिम प्रेरणा नाही.

आता मी, मी आणि माझं त्या त्या वेळचं कुटुंब यांची व्यवस्थित 'काळजी' घेतो.

त्या त्या वेळचं कुटुंब म्हणजे.. आधी भावा बहिणींसाठी आपल्या तोंडचा घास काढून देणारा मी, आता माझ्या मुलांसाठी त्यांच्याच तोंडून तो हिसकावून घेऊ शकतो.

वारशात मिळालेल्या प्रॉपर्टीसाठी मी महाभारताचा आदर्श ठेऊन आपल्याच भावांशी लढतो.

लहान होतो तेव्हा कळायचं नाही.

पण आता मोठं होण्यातलं मोठेपण कळतंय!

काही असो, शाळेत शिकलेल्या कालबाह्य बाळबोध सुविचारांवर मात करत मी मोठा झालोच!

आता मोठेपण मिरवत फिरताना त्या लहानपणच्या मूर्खपणाची किती लाज वाटतेय सांगू!

पण गेले ते दिवस.

आता मात्र मी आहे नि माझे मोठेपण आहे!

# *मी माणूस कसा झालो*

'ऐकावे ते नवलच' अशी काही सदरे पूर्वी काही मासिकांत असायची. आता ती मासिकेही गेली. ते मासिकांचे वाचक ही गेले. पण नवलाच्या गोष्टी मात्र टिकून आहेत. फक्त त्यांची जागा बदलली. आता फेसबुकावर किंवा कुठल्यातरी ब्लॉगवर हवा तो, हवा तसा, नि हवा तेव्हा, हवा तितका मजकूर टाकायची सोय झाली. संपादकीय संस्कारांची मातब्बरी मोडत हवे ते प्रकाशित होते. प्रकाशनातील नवलाई गेली असेल पण ऐकावे ते नवल असल्या नवलाईतील नवलत्व मात्र टिकून राहिले आहे अजून!

मागे अशाच एका ठिकाणी 'मी माणूस कसा झालो' या विषयावर 'नवलाई'चा ब्लॉग लिहायची स्पर्धा झाली. 'माणूस कसा झालो' यात कसली नवलाई असायची? माणसाचे माणूसपण ह्यातच नवलाई आहे असे आयोजकांस वाटत असावे की काय कोण जाणे! काही असो,लिहिणे नि स्पर्धा म्हटले की मी मागे हटत नाही. ब्लॉग हवा, तो ही नवलाईपूर्ण! लिहून टाकू.

माझ्या कल्पनाविश्वातील घोडा कधीच बसत नाही. फक्त कधीमधी उभ्या उभ्या डुलक्या काढत असेल इतकेच. तेव्हा या स्पर्धेच्या बातमीने टाच मारली गेली. माझ्या हातचा लगाम कल्पनावारूच्या पाठीवर 'है है' .. म्हणत उगारला गेला. त्याची

कातडी थरथरली नि तो उधळला.. त्यातून झालेली ही ब्लॉग निर्मिती.. अर्थात 'मी माणूस कसा झालो!'

सोशल मिडियावरील लिखाणास सत्यासत्यतेचे बंधन नसतेच. तेव्हा हा मजकूर संपूर्णपणे काल्पनिक आहे अशा वैधानिक इशाऱ्याचीही गरज नसावी!

***

फार युगांपूर्वीची गोष्ट आहे. मी होतो. अहं ब्रह्मास्मि स्वरूपात होतो. मी ब्रह्म आहे की ब्रह्म म्हणजे मी यावर वर स्वर्गलोकात नि मी मुळातच आहे की नाही यावर पृथ्वीतलावर चर्चा व्हायच्या. मनोरंजन म्हणून देवलोकातून मी ते सारे पाहात असल्याचे आठवते अजून ही. अर्थात तसा मी तेव्हा बिझी असायचो फार. नवीन नवीन विश्वनिर्मिती झालेली. निर्जीव नि सजीव सारे घडवायचे, सजीवांना निर्जीव सृष्टीवर अवलंबून बनवणे, त्यांच्या डिझाइन मध्ये जसा जसा वेळ जाईल तसा बदल करणे वगैरे कामाचा बोजा फार होता. विश्वनिर्मितीत तसा माझा बहुतेक वेळ जायचा. मात्र माणसाला बनवायला जितका वेळ लागला तेवढा बाकी गोष्टींसाठी लागला नसेल. एकेक प्राणी, पक्षी, झाडझुडुप वगैरे डिपार्टमेंटचा चार्ज असणारे देव हाताखाली होते. त्यातच मग निर्जीव अशा डोंगरदऱ्या, नद्यानाले, समुद्र वगैरेंचा चार्ज असणारे काही देव होते. आधी निर्जीव काही बनवणाऱ्यांचे स्किल पाहून त्यांचे प्रमोशन सजीव विभागात करायचे. इकडे पृथ्वीतलावर इंजिनियरांचा टॉप वर्ग जसा आयआयटीत, त्यातला टॉप मुंबईत, आणि त्यातला अति मलईदार कॉम्प्युटर सायन्समध्ये जावा तसा तो आमच्या देवाधिदेवातील टॉप वर्ग 'माणूस डिपार्टमेंट'मध्ये घातला जाई. बाकी टॉपर्स झाडेझुडपे, मोठे प्राणी वगैरे विभाग सांभाळत. काही उमेदवारीच्या काळात एकपेशीय अमीबा वगैरे जीवसृष्टीच्या

विभागात इन्टर्नशिप करत. थोड्या अनुभवानंतर साधे प्राणी, मग काही का ॅम्प्लिकेटेड प्राणी वगैरे. पण हे प्रमोशन मानवनिर्मितीत काही व्हायचे नाही. पोलिसखात्यातील वरिष्ठ जसे आयपीएस मधून येतात तसे टा ॅपर देव 'माणूस'खात्यात डायरेक्ट नियुक्त होत. थोडक्यात मानवनिर्मिती हा सर्वात चॅलेंजिंग विभाग. तिथे सगळी कसोटी इन चार्ज देवांची लागे.

पृथ्वीवर खाली पाठवलेला मनुष्यगण तसा हुशार. म्हणजे एक जण दुसऱ्यासारखा नाही हे ओळखून असणारा. त्यात काही स्वत:ला शहाणे समजणारे तर काही अति शहाणे. काही असो, पण प्रत्येकास आपण इतरांहून वेगळे व मोठे असल्याचे वाटणे ही ईश्वर म्हणजे अस्मादिक निर्मित मानव सृष्टीची कमाल होती.

सुरूवातीची गोष्ट. म्हणजे तसा माणूस प्राणी शिकार वगैरे करायचा. वल्कले घालायचा. हळूहळू तो शेती शिकला. एकाजागी स्थिरावला. मेंदूला मोकळीक मिळाली म्हणून की काय पण पुढे गंमत झाली. पृथ्वीतलावर मनुष्य वर्गास माझा म्हणजे ईश्वराचा शोध लागला! सृष्टीनिर्माता म्हणजे देवाधिदेव. कुठे असतो? कसा दिसतो? याबद्दल मतमतांतरे व्यक्त होऊ लागली. मी आहे नि साऱ्या जगाचे नियंत्रण करण्याची ताकद बाळगून आहे यावर मनुष्याची खात्री पटली. मी खूश तर मनुष्य बिनधास्त! आपल्या बा ॅसला जसे खुश ठेवावे तसा देवही खुश व्हावा म्हणून काय करावे याच्याही चर्चा झडू लागल्या. माझी मर्जी राखण्यासाठी मनुष्यातीलच काहींनी, मला कधी न पाहता वा भेटता, वेगवेगळे उपाय सुचवले. तिकडे पृथ्वीवर लोकांनी आपल्या वरिष्ठांस खूश ठेवण्याचे फायदे प्रत्यक्ष पाहिलेच होते. मग देव त्याहून किती वेगळा असणार? लोकांनी मग आपली कल्पना शक्ती ताण ताण

ताणली. मनुष्यास आवडते काय? तर दुसऱ्याने त्यास मान देणे. त्यास मोठा समजणे. मग त्यास मस्का बिस्का लावणे, वगैरे वगैरे. मनुष्यास वाटले, हॅतिच्या! आपण पाहिला नसणारही, पण देव देव म्हणतात तो याहून वेगळा नसणार! त्याची भक्ती करा, पूजा करा, नवस करा! मस्कापा ॅलिशी करा वगैरे शब्द जरा असांसदीय, तेव्हा यास व्रतवैकल्ये वगैरे शब्द वापरा.. काहीही करा, पण मेक हिम हॅपी. त्यात हिम मधला एच पण कॅपिटलात लिहा, देव खूश तरच आपण खूश! आणि त्यांनी कधीही न पाहिलेल्या माझ्यासारख्या भगवंताची दुनिया या पृथ्वीतलाहून वेगळी कशी असणार? थोडक्यात मानवी जगताचे नियम देवाला माणसांनी लावायला सुरूवात केली!

इकडे आम्हा देवादिकांची थोडी पंचाईत व्हायला लागली व देवादिकांच्या घरून वरून मानव निर्मिती झाली की त्याला पृथ्वीवर जन्म घेऊन पाठवावे.. एकदा हातून बनला माणूस नि पृथ्वीवर पोहोचला की प्रत्यक्ष देवाच्या हाती काय राहते? माणूस एकदा जन्मला की पहिली दहा पंधरा वर्षे पृथ्वीवर निरागसपणे राहतो, बागडतो. जसजसा मोठा होतो त्याची निरागसता संपायला लागते. मग त्यातून असंख्य स्वभाव डेव्हलप होतात. कुणी दयाळू, प्रेमळ तर कुणी दुष्ट आणि कावेबाज. कुणी बेरकी कुणी सैतानी प्रवृत्तीचा. कुणी लबाड, कुणी धूर्त. कुणी इतरांस फसवणारा. सारी माणसे आमच्याच मानव डिपार्टमेंटमधून बनायची. पण ती अशी पुढे का निपजावीत? तेव्हा आपल्याच निरागस निष्पाप निर्मितीला असे बदलताना वरून हतबलपणे पाहणे याहून जास्त आम्ही देवादिक तरी करणार काय? याबद्दल स्वर्गलोकी नरकवास वगैरे शिक्षा असत, पण शिक्षा वगैरे सर्व नंतरची गोष्ट. म्हणजे

त्या त्या माणसाला वरती रिका ॅल केल्यावर. त्यातील काही नमुन्यांस मग पुढचा जन्म म्हणून सिनेमाचा सिक्वेल यावा तसा रेडिमेड आत्मा वापरून परत पृथ्वीवर धाडले जाई. हे जन्म नि मृत्यूचे अखंड चक्र बहुतेक देवादिकांस बिझी ठेवत हे खरे. त्यात माणसाला सुधारायचा अयशस्वी प्रयत्नही होई. पण एकूण आमच्या हातून बाकी सृष्टी नियंत्रित होत असली तरी हा मानव नामक बेरकी प्राणी काही पकडीत येत नव्हता. त्यात परत त्याच मानवाने खाली माझ्या नावे धर्म बनवले, पंथ बनवले. माझ्या नावाखाली स्वत:च्या कल्पनाशक्तीने काय काय घडवून आणले. मी सर्वशक्तिमान, पण या माणसापुढे हतबल होण्यावाचून इलाज तरी काय होता? वरून धाडताना मी निष्पाप निरागस माणूस प्राणीच पाठवत होतो..

पुढे मग जगभरात अंदाधुंद अवस्था झाली. मानव प्राणी माझेच नाव घेऊन एकमेकांच्या उरावर बसायला लागला. कोण कोणाचा जीव घेईल सांगता येईना. वरून पाठवताना सर्व जीवांचा जीवन काल ठरलेला असे नि सटवाई नशीबाच्या रेषा आखून देत असे. पण आता लोकांनीच एकमेकांचा अंत करायचे ठरवले तर प्रत्यक्ष ईश्वराचा काय निभाव लागणार होता? मग एके दिवशी सर्व प्रमुख देवांची इमर्जन्सी सभा बोलावली गेली. सभा वादळी झाली. बाकी देवांनी रोष व्यक्त तर केलाच पण विश्वनिर्माता म्हणून माझी काही जबाबदारी आहे की नाही असले प्रश्न उपस्थित झाले. सारी सृष्टी कह्यात ठेवू शकत असताना या मनुष्यप्राण्याने कहर माजवला आहे नि त्याचा जाब ब्रह्म म्हणवणाऱ्या मला विचारला जाऊ लागला..

सभा संपली तेव्हा एक निर्णय झाला.. तो हा की आपल्याच निर्मितीचा जरा अजून खोलात अभ्यास व्हावा. तो करायचा असेल तर पृथ्वीतलावर जाण्यास पर्याय नाही. नि जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे म्हणतात.. तेव्हा प्रत्यक्ष मी एका मानवाच्या पोटी जन्म घेऊन यावे. माणूस म्हणून जगून पहावे नि परत आल्यावर काही सुधारणा किंवा बदल संभवतात ते पहावे..

आणि मी माणूस झालो.. पन्नास एक वर्षांपूर्वी जन्म घेऊन इथे आलोय एक माणूस म्हणून..

***

माझा ब्लॉग इथेच संपतो.

मी माणूस कसा झालो याची ऐकावे ते नवलच प्रकारातील ही कहाणी!

आता थोडे परकाया प्रवेशासारखे एक काल्पनिक पूर्वजन्मीचा ईश्वर म्हणून घेतलेले काल्पनिक अनुभव! सहज जाता जाता.. हे आपले अजून एक कल्पनोड्डाण!

***

तुम्हाला सांगतो, माणूस म्हणून जन्म घेऊन इतकी वर्षे उलटलीत आता. अजूनही या बिलंदर नि कॉम्प्लेक्स प्राण्याचा अंदाज येत नाही. फक्त पूर्वजन्मीच्या माझ्या अवताराबद्दल या मानवाची मते पाहून चकित होत राहातो. माझेच नाव घेऊन माझीच देवळे उभारली जातात. नि तिथेच मानव तितुका एकच आहे या शिकवणुकीपासून फारकत घेत मानवामानवात संघर्ष सुरू आहे. माझ्याच नावे भक्तीची दुकाने उघडली जाताहेत. माझेच नाव घेत लोक बेईमानी ही करतात.

माझीच पूजा मांडत माझ्याच नावे गैरव्यवहारही चालतात. माझ्याच नावे छातीठोकपणे एक समूह दुसऱ्यास हीन लेखतोय.. लोक एक दुसऱ्याच्या उरावर बसतात.. दंगली उसळतात. माझी देवळे उभारावीत म्हणून माझीच निर्मिती असलेल्या इतर मानवांस परत परलोकी पाठवतात.. खरे सांगतो, मला माणूस म्हणून माझेच भविष्य ठाऊक नाही. इकडे जन्म घेतला तेव्हा पूर्णपणे माणसाचीच मानसिकता हवी म्हणून ना मला माझे भविष्य ठाऊक आहे, ना माझा एकूण जीवन प्रवास. ठाऊक नाही मला परत माझ्या लोकी कधी जावे लागेल..

पण माझे डोके चक्रावलेय..

आता मलाही कळेनासे झालेय..

परत तर जाईन मी..

पण या माणसाच्या सुधारणेची सुरूवात कोठून कशी करावी?

# *माझ्या शाणपट्टीचे मोती!*



माझं एक मी पाहून घेतलंय, मी तसा खूप शहाणा आहे. उगाच कोणी मला 'अबे शाण्या' कशाला म्हणेल? म्हणजे शाळेत असल्यापासून मी हे ऐकत आलोय. तसं असेल तर ते खोटे कसे असेल? इतके जण इतक्यावेळा इतके असत्य कसे नि कशास बोलतील? थोडक्यात काय माझ्या शहाणपणास मर्यादा नाहीत. किंवा मी याबाबतीत अमर्याद पुरूषोत्तम असेन कदाचित.

कदाचित कशाला? आहेच.

शहाणपणा हा अभावाने आढळणारा गुण आहे असे शहाणे लोक म्हणतात. तर मला ही तसे म्हणणे क्रमप्राप्त आहे, नाही का? शहाणपणा दाखवून तुम्ही ते मान्य कराल याची खात्री आहे मला!

तर माझा शहाणपणा!

खरं तर हा काही वादाचा किंवा विवादाचा मुद्दा नाही. या मुद्दयावरून कुणी गुद्द्यावर यावं असंही नाही. म्हणजे मुद्देसूद कथन करता करता काही विघातक

शक्तींनी ती गुद्देसूद बनवावीच असं काही नाही. आता विषयच निघालाय म्हणून.. ह्या विघातक शक्ती वेगवेगळ्या असू शकतात.. स्थळ काळानुसार! म्हणजे काही वर्षांपूर्वी परदेशस्थ शक्ती देशविघातक असायच्या! हल्ली त्या स्थलांतरित होऊन देशांतर्गतच स्थिरस्थावर झाल्यात असे ऐकिवात आहे! असो! राजकारणच ते! अशा खऱ्या किंवा काल्पनिक बागलबुवांखेरीज पुढे कसे सरकायचे? तर, शहाण्यासुरत्यांना रोखण्यास अशा विघातक शक्ती असावयाच्याच! नाहीतरी अगदी पुराणकालापासून सत आणि असत यांचा संघर्ष ही सनातन बाब आहे. त्यात असत म्हणजे या विघातक शक्ती नि सत म्हणजे माझ्यासारखे काही शहाणे! कुणी सुरते पण म्हणतात! तर त्या शक्ती माझ्यामागे लागाव्यात हाच माझ्या सत् पणाचा म्हणजेच शहाणपणाचा पुरावा म्हणावा की नाही?

तसे पाळण्यात माझे पाय जास्त दिसले नाहीत कारण माझ्या दांडगटपणाने पाळण्याचेच पाय तुटले म्हणतात. असतीलही. पण तसे नसतील तरी धन्व्यार्थीने पाळण्यात पाय लहानपणापासून दिसलेच असणार. अगदी लहानपणी आई मला 'शहाणा माझा बाळ' म्हणे. नंतर का कोणास ठाऊक त्याचा उच्चार बदलत बदलत आई मला 'शहाणाच आहेस!' असं म्हणायला कधी लागली ते आठवत नाही. थोडक्यात दिवसेंदिवस माझ्या शहाणपणाबद्दल तिला अजूनच खात्री वाटायला लागली असणार.

तर मुद्दा हा की शहाणपणास आरंभ तेव्हापासूनच झाला हे खरे! ही अगदी शालेय दिवसांपासूनची गोष्ट. म्हणजे शाळेत मागच्या बाकावर कुणी बसले की शहाणपणाला बहर येऊ शकतो. त्या शाळकरी वयात यास मस्तीखोरपणा नाहीतर हूडपणा असली काही विशेषणे लावून शहाणपणाचं कौतुक होत असे. माझे तर असे

कौतुक फारवेळा झाले. अर्थात कौतुकाच्या दोन शब्दांबरोबर शिक्षकवर्ग उगाच शिक्षा वगैरे का करत असे कोणास ठाऊक! नि त्यामुळे माझी बसण्याची जागा पण बदलत राही. शहाणपणा जणू संक्रमित होणारा आजार समजून की काय, पण इतर मुलांना त्याची लागण होऊ नये अशी इच्छा असावी की काय न कळे. पण ईश्वरकृपेने मिळालेला शहाणपणा असा सहजी संक्रमित होईल की काय? असे नशीब सर्वांचे बलवत्तर नसते. नि चांगले नशीब पण नशीबवानांच तर मिळत असते!

तर सांगण्याचा मुद्दा हा की शहाणपणा माझ्यात लहानपणापासूनच झळकत होता. त्याची मला जाणीव होती आणि त्या जाणिवेने मी अजूनच शहाणपणा दाखवत असे. पण लोकांनाच त्याबद्दल मी एक न्यूनगंड देत असणार. नाहीतर एकाच वेळी सारे मला 'शहाणाच आहेस' कसे म्हणतील? पुढे का ॅलेजात व्रात्य पोरे यास शाणपट्टी म्हणायला लागली. म्हणोत बापडे. त्यामुळे माझे उपजत शहाणपण थोडेच झाकले जाणार होते?

मला तशी मतं लवकर फुटली. बहुतेकांना पंधरा वीस वर्षांचे असताना आपल्याला सारे काही समजते असे वाटत असते. आपल्याला सारे कळते हे वाटणे वेगळे नि माझ्यासारखे खरोखरच सारे काही कळणे वेगळे! अर्थात पुढे मला हे ही कळले, आपल्याला काय कळत नाही हे ही कित्येकांना कळत नाही! पण खरी गोष्ट ही की मला खरोखरच सारे काही समजायला लागले, ते ही खूप लवकर. माझा पाळणा थोडासा अजून दणकट हवा हे मी तेव्हा पाळण्यात असतानाच समजून चुकलो होतो, फक्त बोलणे तोवर शिकलो नसल्याने ते व्यक्त करायला भोकाड

पसरण्याशिवाय अन्य मार्ग नव्हता. अर्थात मग जमलेले सारे मला खुळा समजून की काय, खुळखुळा काय दाखवायला लागले, कुणी माझे दुपटे काय बदलले, कुणी ओय ओय म्हणाले तर कुणी बेसूर आवाजात गुणगुणू लागले.. ती आमची शेजारीण. रडत नाही .. पाळणा परवडला पण (बे)सूर आवर म्हणत मी शहाणपणाने रडणं आवरतं घेतलेलं मला अजून आठवतं. त्यातून मग त्या गायिकेस स्वत:च्या गाण्याबद्दल सुपिरिया ॅरिटी का ॅम्प्लेक्स निर्माण झाला असावा. त्यामुळे मी रडायला लागलो की त्या शेजारणीला पाचारण केलं जाई. नि मला सारा शहाणपणा पणास लावून गप्प व्हावेच लागे!

असो. असे ते बालपणीचे सुरूवातीचे दिवस. म्हणजे माझ्या शहाणपणाच्या सुरूवातीचे. मग शाळा का ॅलेजात शहाणपणाचा वारू उधळू लागला. त्यामुळे कधी 'घोड्यापुढे धावते अक्कल', 'आमचा बाळ ना, असलाच! अकलेचा कांदा' वगैरे भाषिक मुक्ताफळं हे त्यालाच लागलेलं फळ. त्यामुळे माझी भाषिक वाढ ही फार लवकर व्हायला सुरूवात झाली. पाळण्यातून केलेला बिन भाषिक रूदन निषेध सोडला तर नंतर माझ्या भाषिक चातुर्यास कधीच भाषेचा अडसर आला नाही तो यामुळेच असावा. अर्थात शहाणपणा हा स्थल काल भाषा आदि बंधने ओलांडून ओसंडून वाहू शकतोच! तेव्हा भाषिक प्रगतीने ते थोडे सुकर झाले इतकेच!

शहाणपणाच्या गोष्टी अशा सुसाट वेगात जात असताना खरा करकचून ब्रेक लागला तेव्हा त्याचा आवाज लग्नातील मंगलाष्टकांचा असेल हे कुणी सांगूनही पटलं नसतं मला! म्हणजे मुळात माझ्याहून शहाणं कोणी निपजले असेल, माझ्या शहाणपणास कुठे, कधी, कसा ब्रेक लागू शकतो हे तोवर माझ्या शहाण्या मनाच्या गावी नव्हते. पण बोहल्यावर चढल्या चढल्या वामांगीने माझ्या शहाणपण

डिपार्टमेंटचा चार्ज घेतला नि मला काहीच कळत नाही हे पुढील काही वर्षांत मला समजून चुकले. पुढे हा कौटुंबिक कावा समजून नि उमजून त्यातून बाहेर पडण्यात काही वर्षे गेली. पण शहाणपणा ही जागतिक पत्नीवर्गाची सवय आणि मक्तेदारी असून कौटुंबिक बाबी वगळता अन्य जीवसृष्टीच नव्हे तर निर्जीवसृष्टीबद्दल मते बाळगण्यास पतीवर्गास पूर्ण स्वातंत्र्य आहे हे कळले नि मग आजवर थबकून नि थिजून एका जागी उभा असलेला माझा शहाणपणाचा अश्व विश्वविजयासाठी अश्वमेध करावयास धावावा तसा उधळून धावत सुटला. थोडक्यात काय तर सुप्रीम कोर्टाने माझ्यावर आणलेला तात्कालिक शहाणपणा वरील स्टे उठला!

आता गेली काही वर्षे मी स्व शहाणपण नि शहाणे करोनि सोडावे इतरेजनां हे ब्रीद पाळत आलो आहे. कुठेही काहीही परिस्थिती असो, कोणी कुठल्याही स्थितीत असो, मी शहाणपणच्या चार गोष्टी सांगितल्याशिवाय राहात नाही! कोणी काही म्हणो. काही कुत्सितपणे यास नसता शहाणपणा म्हणोत की शाणपट्टी म्हणोत की अजून काही. हे मोती उधळणे हे कर्तव्यच समजून सकलां शहाणे करून सोडत आलो आहे. शेवटी आपल्या देवदत्त अतिशहाणपणाचा किंवा काही जण म्हणतात तशा दीड शहाणपणाचा इतरांस फायदा व्हावयास हवा की नाही? हॅवज् ने हॅवज ना ॅट्स ना मदत करायलाच हवी की नाही?

इतके निरूपण केल्यानंतर शाणपट्टीचे मोती नमुन्यादाखल तरी न देणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. तेव्हा चिमुरड्यांचे चिमखडे बोल कवतिकाने छापतात तसे काही नमुन्यादाखल किस्से सांगता येतील.. थोडक्यात नि थोडकेच. हे देखील एक शहाणपणच. उगाच लांबण लावून कोणालाही कंटाळा आणू नये म्हणतात! खरंच आहे ते!

पण खरी गोष्ट अशी आहे की माझा अंगभूत शहाणपणा हे सांगतोय.. आधीच बऱ्यापैकी लांबण लावून झालीय! तेव्हा अधिकच ताणू नये.. नाहीतर आधीच थोडेफार असलेले (किंवा खरेतर नसलेले) वाचक वाचता वाचता ताणून द्यायचे! तेव्हा अधिक शहाणपण दाखवत अजून शाणपट्टीचे मोती न उधळता इथेच थांबावे हेच शहाणपणाचे!

जाता जाता..



एकूणच माझ्या व्यक्तिमत्वात हा शहाणपणाचा भाग मोठा आहे.. त्यानुसार शहाणमोती विखरावयास मला आवडते. मोठमोठ्या माणसांस कुत्सित बोलांस सामोरे जावेच लागत असेल तर माझ्याबाबतीत कोणी यांस शाणपट्टीचे मोती म्हटले तर मी का मनावर घ्यावे? आपल्या अंगभूत शहाणपणाने तिकडे दुर्लक्ष करत रहावे नि इतरेजनांस हा मोत्यांचा चारा खाऊ घालावा.. निरपेक्षतेने.. ह्यातच खरा शहाणपणा आहे!

जाता जाता हा एक शेवटचा मोती वेचून जातो..!

# *शहामृग..*

## *(३ फुल्ल १ हाफ नि १ पाव!)*

१.

शहामृग माझा आवडता पक्षी आहे.

कारण विचाराल तर, एक तर नावात मृग आहे नि त्या मृगांचा हा शहेनशहा नावाप्रमाणे तरी 'शहा'मृग आहे. बाकी त्यात मृगाचा डौल आहे का, मृगनयनी डोळे आहेत का वगैरे तपशील एखाद्या शहेनशहाच्या बाबतीत तसा गैरलागू म्हणावा! म्हणजे एकदा त्या शहेनशाही तख्तावर विराजमान झालेल्या कोणाचे सारेच मनोरम नि मनोहर असायचे. त्यात कुणी कसलीतरी खोट काढणे शहेनशाही राज्यास नि बिरूदासही पटण्यासारखे नाही नि कदाचित कित्येकांस खपण्यासारखेही नाही. आणि अशा शहेनशहास वाकून कुर्निसात करण्यात नि त्याचे गुणवर्णन करण्यातच खरे (राजकीय) शहाणपण आहे हे मी आयुष्य नामक शाळेत शिकलो आहे.

तर शहामृग माझा आवडता पक्षी आहे हे खरे..

२.

माझ्या आजूबाजूला काही न काही घडतच असते. आजच्या पिढीतील कोणी याला 'इट्स हॅपनिंग' म्हणेल. पण मी आजच्या पिढीतला नाही, तर तसे मी म्हणणार कसा? पण मुद्दा तो नाही. देश आहे, राज्य आहे, गाव आहे, आमचा इलाका आहे, गल्ली आहे.. कुठेना कुठे काही ना काहीतरी घडत असतेच, असणारच.

आपल्याकडे माणसांची काय कमी? माणसेच माणसे आजूबाजूला आहेत. त्या माणसामाणसात काही ना काही संघर्ष असायचाच! भांड्याला भांडे लागते तसा माणसास माणूस भिडायचाच! भिडला की बाचाबाची व्हायची. बाचाबाचीत कोण कोणाचा बा काढेल सांगता यायचे नाही. कुणी गळा पकडेल तर कुणी कोणाचे पाय ओढेल किंवा जो मिळेल तो अवयव वापरून दुसऱ्यास वठणीवर आणायचा प्रयत्न करेल. आपल्यावरील कथित अन्यायाविरूद्ध कोणी पेटून उठेल. कुणी स्वत:स श्रेष्ठ समजणारा कनिष्ठत्वाच्या वागणुकीच्या भावनेने तर कुणी कनिष्ठ स्वत:स श्रेष्ठ समजून. अर्थात हे श्रेष्ठ वा कनिष्ठत्व सामाजिक उतरंडीतील! जात, धर्म,भाषा वा पंथाधारित! मग कुणी कुणाला त्याबद्दल काय शिक्षा करावी नि कुणी, कसा, कोणाचा बदला घ्यावा कसं सांगता येईल? लोक सारं सहन करतील, पण अपमान? मुळीच नाही! स्वाभिमानास ठोकर लागली की समोरच्याचा गळा पकडतील. सभ्य भाषेत रोष व्यक्त होत नाही म्हणून असभ्य शब्दांचा वर्षाव करतील..

थोडक्यात काय.. विविध मुद्दयांवरून उहापोह.. चर्चा.. वाद.. वादावादी.. भांडणतंडण.. गुद्दागुद्दी.. ते दंगल पेटणे अशा हायरार्कीत गोष्टी घडत असतात.. मुद्दा कधी हा, तर कधी तो.. त्यावरून गुद्दा कधी हलकेच तर कधी जोरदार. पण समाज सतत असा ढवळून निघत असतो.. समाजमंथनच म्हणा ना! कित्येकदा त्यातून सामाजिक अस्थिरतेचे हलाहल निघत असेल तरी ते सारे मी निमूट पाहात असतो.. कधी वाचतो.. कधी पाहातो.. नि मग न चुकता विसरून जातो.

कुठे कुठे पुरा पडणार मी? शेतकऱ्यांचे आंदोलन? आय ॲम ना ॅट अ फार्मर! नाहीतर शेतकऱ्यांची जमीन घेऊन एन ए करत घरे बांधली असती किंवा शेती उत्पन्नावर करसवलत नसती घेतली का? कामगारांचा मोर्चा? मी कामगार आहे?

तसेही हल्ली हा वर्ग असूनही दिसेनासा झालाय. विद्यार्थ्यांचे निषेध मोर्चे.. मी थोडीच विद्यार्थी आहे? आणि विद्यार्थ्यांना कसली आलीयेत मते नि व्यक्त करायला असले मोर्चेबिर्चे काढणे? कधी तर समाजात इतकी घुसळण होते की एका समाजाचे दुसऱ्या समाजावर शरसंधान करायला लागतात. पण मी काय करणार? आय ॲम फ्रा ॅम नायदर समाज! कुणी केला असेल कुणावर अन्याय.. झाला असेल कोणावर अन्याय.. पण अन्याय करणारा.. तो मी नव्हेच!

काय आहे ना, असल्या बातम्या येतच असतात. कुठे इतक्या अमुक जातीतल्यांवर अमुक अमुक अत्याचार.. कुठे तमुक जमातीवाल्यांवर अमुक जमातीचा हल्ला बोल.. मी बापडा काय करणार?

पण नाही!

करण्यासारखे आहे खूप काही!

खूप काही म्हणजे विचार वगैरे!

म्हणजे मी सखोल विचार वगैरे केला.

नाही, त्या बातम्यांवर वगैरे नाही.. तर या विविध संघर्षाच्या घटनांबद्दल.

विचार म्हणजे तसा मी फारसा नेहमी करत नाही.. पण केलाच तर मात्र सखोलच करतो! त्यामुळे डावीकडे पाहात, उजवीकडे पाहात नि नंतर नाकासमोर पाहात रस्ता ओलांडावा तसा मी विचार सर्व बाजूंकडे पाहात करतो.. उगाच डाव्या नि उजव्यांत डावेउजवे न करता विचार करतो..

जेव्हा करतो तेव्हा!

समस्यांना तर तोटा नाही.

लोकांच्या निषेधास नि संघर्षास ही नाही.

त्यावर व्यक्त होणाऱ्या समाजघटकांच्या प्रतिक्रियांना तोटा नाही.

नि सोयीनुसार, सोयीपुरते नि जमेल तसे या सगळ्यांना मॅनेज करणाऱ्या सरकारी यंत्रणेस तर नाहीच नाही.

व्यक्ती काय नि अभिव्यक्ती काय.. अशा स्वातंत्र्यांचा तर जयघोष पदोपदी कानी पडत असतो तो याच यंत्रणांकडून.

प्रत्यक्षात पायमल्ली झाली तरी चालते, पण लोकशाही यंत्रणेत बोलण्यात चुका चालत नाहीत.

दुटप्पीच काय, तिटप्पी व्यवहार ही चालेल.. फक्त तो डोळ्यांआड व्हावा. प्रत्यक्ष्यात जनते समोर आदर्श व्यवस्थेबद्दलच चर्चा हवी.

तेव्हा विचार करता करता जाणवले ते इतकेच.. दृष्टीआड सृष्टी हे फार मोठे तत्व किंवा खरेतर तत्वज्ञान आहे. दृष्टीआडच्या दुनियेत नजरेआड काय घडते नि कायकाय नजरेआड घालता येते किंवा येऊ शकते.. यास अंत नाही. मग कुणी सांगितल्यात त्या नसत्या उचापती नि सगळ्या नकारात्मक बातम्या?

मला उपाय सुचला..

जिथून कुठून बातम्या कानीडोळी पडतील अशांकडे कानाडोळा करावा! कशाला हवीत वार्तापत्रे नि कशाला हव्या दृकश्राव्य माध्यमातल्या बातम्या? जर त्या पाहिल्याच नि वाचल्याच नाहीत तर?

त्या ऐवजी दृष्टीआड सृष्टी किती रम्य आहे याचाच विचार करावा की नाही?

थोडक्यात कान, नाक, डोळे वगैरे घ्राणेंद्रिय बंद केल्यास समोरील दुनियेतील जगणं किती सुसह्य नि समाधानी होईल!

माझ्या विचारांना असे हे फळ धरले.. नि मी विचार अंमलात आणायचे ठरवले.. आता ते धोरण फळफळले नि माझ्या चित्तास शांती प्राप्त झाली आहे!

३.

शहामृग माझा आवडता पक्षी आहे.

त्याचे काय ते दिसणे आणि काय ते उडणे!

किंवा आपला देह कसा वजनदार याचा विचार करून सतत पाय जमिनीवरच ठेवणे.

आपल्या पंखांना न फाकवता ते ना ॅन फ्लाइंग पंख घेऊन पक्षी म्हणून मिरवणे.

आपल्या देवदत्त बारक्या पण मजबून पायांनी धाव घेणे.

आपली पंख नि पीस संपदा काळी असली तरी तिचा विषाद न बाळगता ऐटीत भटकणे..

काय नि किती करावे गुणगान?

त्याचा आदर्श ठेऊन मी चालतो..

समोर दिसली समस्या तर वेगाने पळ काढू शकतो मी.

मला माझ्या असलेल्या नि शासन दरबारी नसलेल्या वजनाची जाणीव आहे..

मग मी उडण्याचा प्रयत्न करत बसत नाही.

मी तरीही मिरवून घेऊ शकतो..

मी सामान्यातिसामान्य असल्याचा न्यूनगंड मला नाही.

शहामृगाचा आदर्श ठेवतो मी.

शहामृग माझा आवडता पक्षी आहे तो काय उगीच?

पण इतक्यावरच थांबत नाही हे शहामृगी गुण पुराण!

शहामृग वाळूत डोके खुपसून उभा राहू शकतो. क्षणार्धात सारी सृष्टी दृष्टीआड करू शकतो. दृष्टीआड सृष्टी करता आली तर अजून काय हवे?

मी ठरवून टाकले ते हेच ..

शहामृगी आदर्श ठेवावा. बाह्य जगातील बातम्या ऐकणे किंवा पाहाणे बंद करावे .. उगाच अस्वस्थ होणे बंद.. उगाच नको तो विचार करणे बंद..

शहामृगासारखे आपले शिर वाळूत खुपसून बसावे

नि साऱ्या जगाकडे पाहणे ही बंद करावे!

सत्ता राबवणाऱ्यांना तरी दुसरे काय हवे? इतका राजकीय शहाणपणा दाखवला तर जिणे सुसह्य होईल नाहीतर काय!

***

एक हाफ..

मध्यंतरी कुणीतरी माध्यमस्वातंत्र्याबद्दल गळे काढत असल्याचे ऐकिवात होते. म्हणे शासनयंत्रणेस 'जो तुमको हो पसंद वही बात कहेंगे' हे धोरण अवलंबणारीच माध्यमे हवीत. फक्त गुड न्यूज देत त्यांच्या गुड बुक्स मध्ये बसायलाही स्पर्धा आहे म्हणे! विचार केला तेव्हा वाटले नि पटले ही.. फक्त सकारात्मक बाबी जनसामान्यांस

दाखवून त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा भरण करणाऱ्या शासन यंत्रणेचे आभार मानावे तितके थोडेच!


उगाच शहामृगासारखी मान वाळूत कोणी कितीवेळ खुपसून ठेवावी? त्यातून मानेचे विकार जडावयाचे. अनारोग्यावरील खर्चापेक्षा आरोग्यरक्षणच महत्वाचे नाही का? तेव्हा हा जालीम इलाजच बरा!

खरं सांगतो, एरवी मी फारसा विचार करत नाही. वर शास्ता कोणीही असो मान खाली घालून आज्ञापालनाचे कर्तव्य पार पाडतो. पण हे सर्व पाहून नि ऐकून आपल्या जनतेबद्दल अशी कळकळ वाटणाऱ्या शासन यंत्रणेबद्दल ऊर प्रेमाने भरून आला.. खरे सांगतो.

***

एक पाव..

तरीही एक मात्र आहे,
शहामृग माझा आवडता पक्षी आहे..



# मी मोठा झालो..

मी खरेच मोठा झालो त्या दिवशी. अगदी तुका आकाशाएवढा म्हणावे तुकाराम महाराजांनी तसा.

म्हणजे आधी मी लहान होतो तेव्हाची गोष्ट. लहान म्हणजे वयाने लहान. विचाराने लहान.. वगैरे. म्हणजे लहानसहान गोष्टींबद्दल तेव्हा मी विचार करत नसे. एकूणच लहान वयसुलभ असे वागणे असे माझे. बालसुलभ म्हटले असते मी, पण माझे तसले लहानपण बाल वयानंतर ही टिकून राहिलेले. कदाचित मी टिकवलेले ही असेल.

आम्ही तीन भावंडं. एक बहीण नि आम्ही दोघे भाऊ. मी भावामधला मोठा. मोठ्या बहिणीहून धाकटा. थोडक्यात मी मधला. लहानपणी आई काय की वडील काय.. संस्कारबिंस्कार करायच्या मागे असायचे नेहमी. आमची शाळा पण त्याच माळेतील मणी. शाळेच्या भिंतींवरील सुभाषिते वाचून त्यावर विश्वास ठेवायचे ते वय. तुम्हाला सांगतो, ते बाळकडू फारच जालीम असावे, कारण त्याचा परिणाम आता आता पर्यंत जाणवत होता. अर्थात काही काही बाबतीत तो टिकून आहे आजवर. पुढे ही टिकेल. काही बाबतीत या बाजूने मोठे होणे अजून बाकी असावे कदाचित. पण हल्लीच मी मोठे होण्याच्या मार्गातला एक मोठा टप्पा गाठलाय..

लहान वयातील त्या निष्पाप निरागस नि मातीच्या गोळ्यासारख्या इंप्रेशनेबल मनावर ठसलेले विचार किती त्राससायक ठरतात ते आता कळतेय मला. म्हणजे जगातील प्रत्यक्ष व्यवहार वेगळा, नि प्रत्यक्षात मिळणारी शिकवणूक मात्र वेगळी. पुस्तकी ज्ञान कामाचं नाही म्हणतानाच हे शालेय नि संस्कारभरीत ज्ञान बिनकामाचे ठरावे अशी दुनियादारी समोर घडताना दिसत असते. त्यात मग 'सदा सत्य बोला' किंवा 'ऑनेस्टी इज द बेस्ट पा ॅलिसी' असली काही प्रत्यक्षात कालबाह्य पण अजूनही शिकवली जाणारी वचने आहेत. त्यांच्या बालमनावरील परिणामाने होणाऱ्या नुकसानाचा कोणा शिक्षणतज्ञाने कधी विचार केला आहे का? माझे हेच झाले. शिकलो एक.. मोठे होता होता पाहिल्या त्या गोष्टी अजूनच वेगळ्या. त्यात मग दोन्ही बाजूमध्ये नित्य घडणारा संघर्ष. बालमन म्हणते जे शिकला आहेस त्या मार्गावर रहा. दुसरे मोठे होऊ घातलेले मन म्हणते, बी प्रॅक्टिकल.. उगाच ते बालमनाचे ऐकू नकोस. जरा मोठा हो की!

तर निदान एका बाबतीत मी मोठा झालो आता!

झालं काय ना की नुकतेच माझ्या वडलांचे निधन झाले. तसे वय झालेले. जगात अमरपट्टा घेऊन कोण आलंय? तर जगरहाटी प्रमाणे देवाघरी गेलेच ते. आई आधीच स्वर्गवासी झालेली. त्यामुळे क्षणिक पोरकेपणाची जाणीव झाली. बालमनाच्या कौलास अनुसरून मी तेरा दिवस पुढच्या गोष्टींबद्दल गप्प राहिलो. त्यातील निदान दहा दिवस तरी माझे मोठे होऊ पाहणारे मन त्या निरागस निष्पाप बालमनाशी झगडत होते. पण शेवटी त्या बालमनाचा पराभव करून मी मोठा झालोच..

बाबा गेले नि त्यांच्या पश्चात त्यांचा वारसा आमच्याकडे येणार हे नक्कीच होते. आम्ही तिघे, म्हणजे तिघांत वाटा पडणार. हल्लीचे सारे किती चांगले आहे नाही? एका घरी एकच अपत्य. म्हणजे हे वाटण्याचे नि वाटाघाटीचे प्रसंगच नाहीत. पण आम्ही तिघे. वयाने मोठे झालेलो. बहीण रागिणी लग्नानंतर मोठ्या घरी पडलेली. धाकटा भाऊ विनय चांगल्या कंपनीत चांगल्या नोकरीत. आजवर आम्ही तसे मिळून मिसळून वागत आलेलो. विशेष एकमेकांच्या अध्यातमध्यात नसलेलो. लहानपणी तर एकमेकांच्या ताटात जेवणारे आम्ही. आमची रागिणीताई तर आपल्या ताटातला घास आम्हाला द्यायची. विनय तसा लाडका. शेंडेफळच. त्याला झुकते माप मिळायचे. खाऊतला जास्त वाटा त्याला जायचा. तसा मी ही समजूतदारच होतो. आमची या वरून कधी भांडणे झालीच नाहीत. एक तीळ सात जणांनी वाटून खावा.. इथे तर आम्ही तिघेच होतो. नि तीळ ही एकच नव्हता. तर भांडायची गरजही नव्हती.

पण आता परिस्थिती बदलली.. दिवस बदलले. आमची वये वाढली. आम्हाला दुनिया दिसली. दुनियादारी समजू लागली.. तेरावे झाले नि रात्री मग मी वाटणीचा विषय काढलाच. मी दोघा भावांत मोठा. माझ्यावरच पुढाकार घ्यायची जबाबदारी आहे की नाही? गेले तेरा दिवस माझ्या मनात संघर्ष सुरू होता. एक मन म्हणे, नुकतेच बाबा निवर्तले, त्यांना काय वाटेल. दुसरे म्हणे, हीच ती वेळ. याचवेळी काय तो लावून टाक सोक्षमोक्ष.. पण शेवटी दुसरे मन जिंकलेच. मोठे होण्यातली पहिली पायरी ओलांडली नि मी भराभर मोठे होण्याच्या शिड्या चढत गेलो.

विषय काढला नि बोलता बोलता तो वाढला. शब्दाने शब्द वाढले. आजवर कुणी कोणाचे काय देणे लागतो यावर खडाजंगी व्हायला लागली. माझी ती स्वत:च्या ताटातली चतकोर भाकरी आमच्यात वाटणारी ताई हिरीरीने भांडणात

उतरली. विनयने सारा विनय बाजूला ठेवला. बाबांच्या पैशांवरून नि इस्टेटीवरून आधी संयत चर्चा नि नंतर भांडाभांड सुरू झाली. प्रत्यक्ष लढाईत आम्ही तिघेच असलो तरी रसद पुरवायला आम्हा दोघांच्या बायका नि रागिणीताईसाठी तिचा नवरा उभे होतेच. आजवरचा हिशेब मांडला गेला. बाबा आता अनंतात विलीन झालेले. त्यामुळे त्यांना काय वाटेल याचा प्रश्न नव्हताच. आता फक्त उरलेला तो रोखठोक व्यवहार नि दुनियादारी. बाबांच्या कमाईवर आमचा प्रत्येकाचा हक्क आहेच पण तो कसा कमी किंवा जास्त यावर खडाजंगी झाली. एक दुसऱ्यावर आरोप प्रत्यारोप झाले. एकाने दुसऱ्यावर खोटारडेपणाचा आरोप केला. ताईला तिचा पूर्ण एक तृतीयांश वाटा न देण्यावरून आम्हा भावांचे एकमत झाले. मग ताई चिडली. आमचे भावोजी संयमी खरे पण ते ही मग हळूच मैदानात उतरले. ते पाहून माझ्या नि विनयच्या दोघांच्याही बायका भीड चेपून धडाडीने पुढे झाल्या. तशा सुसंस्कृत घरातल्या दोघी म्हणून झिंज्या न उपटता एकमेकांवर शाब्दिक वार करत्या झाल्या. एकमेकांचे नवरे कसे शामळू आहेत नि स्वत:च्याच वडलांच्या इस्टेटीसाठीही कसे भांडणार नाहीत यावर दोघींनी प्रवचनासारखे निरूपण केले. रागिणीही मग रणरागिणीसारखी कडाडली.

थोडक्यात तेरावं झालं नि आम्ही तिघेही एकमेकांच्या उरावर बसलो. कसाबसा वाटणीचा फाॅर्म्युला बनला. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत मग सारा हिशेब संपवण्यात आला..

या सगळ्यात एकच गोष्ट मला समाधान देऊन गेली.. ती ही की या वाटाघाटींत मी कुठेच कमी पडलो नाही. आपल्या वाट्याचे मागून हक्काने घेताना नि बाकी दोघांच्या वाट्यातले कधी हळूच ओढून तर कधी जोरात ओरबाडून घेताना विनय

माझा सख्खा भाऊ नि रागिणी माझी लाडकी ताई असले विचार मनात चुकूनही आले नाहीत. प्रत्यक्ष कृष्णाची शिकवण ती. झगडणे हे कर्त्यव्य. त्याचे पालन करताना कोण भाऊ नि कोण बहीण. म्हणून बोलताना मी शब्दांची कंजुषीही केली नाही. विखारी शब्दांनी मनं दुखावताना मागेपुढे पाहिले नाही. छद्मीपणाने माझ्या वाटच्या पोळीवर जास्त तूप येईल हे पाहताना मी माझे कौशल्य पणास लावले. मध्यरात्री तीन वाजेतोवर चाललेल्या या धुमश्चक्रीत मी हत्यार टाकण्याचा विचारही केला नाही. सकाळी उठलो तेव्हा माझ्या वाटणीत चिमूटभर का होईना जास्त आलेले किंवा खरेतर मी लढून मिळवलेले याचेच समाधान होते..

आता मी खरा खुरा मोठा झालो म्हणजे.

एक तीळ वाटून घ्यायला नि आपल्या घासातला एक भाग इतरांना द्यायला मी तो बालवयीन कुणी अर्ध्या चड्डीतला मुलगा थोडीच राहिलोय आता.. मी आता खरेच मोठा झालोय. मला आता दुनियादारी कळायला लागलीय.. तुकाराम महाराज 'तुका आकाशाएवढा' म्हणत झाले असतील विशालहृदयी, पण ते संत सज्जन. माझ्यासारख्या साध्या माणसाने त्यांची बरोबरी कशी नि कां करावी? व्यवहार समजणारा, दुनियेचे नियम समजणारा नि आपल्या पोळीवर नुसतेच तूप जास्त न ओढता, जास्तीची पोळीही ओढण्याचा प्रयत्न करणारा मी आता समाधानाने सांगू शकतोय.. मी मोठा झालोय.

लहानपणीच्या त्या संस्कारांचे नि शिकलेल्या सुभाषितांचे जोखड फेकून देऊन.. मी मोठे होण्याच्या मार्गातला एक मोठा टप्पा गाठलाच.. मी मोठा झालोय.

# आमची अर्थशास्त्रीय विद्वत्ता



एका अर्थशास्त्राने अनर्थ माजवला आहे असे आमचे एक अर्थपूर्ण वाक्य आहे. आम्ही तसे प्रसिद्ध कुणी नाही, त्यामुळे आमच्या म्हणण्यास विशेष अर्थ नाही असे कुणी म्हणेलही. पण आमच्या विद्वत्तेचा त्याच्याशी अर्थाअर्थी संबंध नाही.

तसे आम्ही विद्वान, आणि जगात विद्वान म्हणून ओळखले जाण्यास हवी तशी पात्रता आमच्यात असल्याचे आम्ही दाखवून देऊ शकतो. काही कठीण व जडभारी शब्दांचा सहजी वापर करून पानेच्या पाने भरणे तसे आम्हास सहजासहजी जमते. आम्ही अर्थहीन वाक्येही गूढ अर्थ असावा अशा रीतीने बोलू शकतो. आमच्या लिखाणास कुणी निरर्थक म्हणावे तर कुणी त्याच लिखाणाचे जीवनाची सखोल खोली, रूंदी आणि लांबी दिसून येते असे अजूनच अनाकलनीय समीक्षण करावे. म्हणजे एकूण आम्ही आकारमानाने नसलो तरी त्या चक्रधरस्वामींच्या हत्तीशी साम्य राखून आहोत असे आम्हास वाटते कधीकधी. कुणास काय दिसावे तर कुणास काय!

असो. विषय आमच्या विद्वत्तेचा आहे. ती आहे अथवा नाही हा नाही. आम्हाला ठाऊक आहे ती आहेच. मग इतरांस ते मान्य होवो अथवा न होवो! थोडक्यात विषय आहे तो आमच्या अर्थशास्त्रीय धारणांविषयक.

आम्ही आमच्या सूक्ष्म निरीक्षणातून नोंदवलेली एक बाब अशी की, ज्यास अर्थशास्त्रीय ज्ञान आहे, जो त्याबद्दल इंग्लिशमध्ये जार्गन म्हणतात तशी भाषा बोलू शकतो त्यास विद्वान म्हणवले जाते. बाकी विषयांपेक्षा अमर्त्य जगात अध्यात्म व मर्त्य जगात अर्थशास्त्र हे विषय एखाद्यास विद्वत्तेच्या जवळ झटक्यात घेऊन जाऊ शकतात. म्हणजे एकच साधेच उदाहरण घेऊ..

'जीवन असार आहे, जीवन म्हणजे मनुजा काय? जीवन म्हणजे अशी गोष्ट जिला न जीव न जंत.. नव्हे जिला न आदी न अंत, जिच्यात कधी आहे अर्थ, नसल्यास अनर्थ, जे जगण्यास कठीण, जे दुस्तर आणि दुश्वार त्याचवेळी अतिशय सोपेसुलभ, जे आहे ही आणि नाही ही.. जे दिसूनही दिसत नाही, असूनही असत नाही.. ते म्हणजे जीवन..' असे काही आपण सांगितले कुणा एखाद्यास, तर तो आपल्याला आध्यात्मिक गुरू मानेल की नाही? चांगला सुसंस्कृत व परंपराभिमानी असेल तर तो 'गुरू आहात' म्हणत आपल्या पाया ही पडेल. तेव्हा सामर्थ्य आहे कथन करण्याचे. कुणी कुत्सित त्यास बडबडीचे सामर्थ्य म्हणेल. म्हणो! म्हणजे बडबड म्हणण्यास अथवा ती करण्यासही आमची हरकत नाही, पण ते नंतर कधी. कारण सध्या विषय तो नाही. विषय आहे आमचे अर्थशास्त्रीय धोरण! आणि तद् अनुषंगे आमची विद्वत्ता!

'इट्स ऑल अबाऊट द मनी' हे ध्यानीमनी ठेऊन आम्हास ठाऊक आहे 'मनी इज द थिंग.. व्हेअर द बक स्टाॅपस्!' थोडक्यात साध्या मराठीत सांगावे तर कोणतेही गाडे अडकते ते पैशांवर हे खरे. पण आधीच ते या भाषेत सांगितले असते तर विलायती शब्दांइतका अर्थ त्यात जाणवला नसता. म्हणजे जाता जाता..

एतद्देशीय संस्कृतात किंवा आंग्लदेशीय इंग्रजीत व्यक्त केलेल्या मतांस जास्त किंमत मिळते. विद्वत्तेकडील रस्ता हा या भाषांतून जातो. अर्थात क्लिष्ट नि कठीण शब्दांचे महत्व या ही भाषांत आहेच हे अधोरेखित करावयास हवेच. म्हणजे दोन गीर्वाण भाषिक वा दोन आंग्लभाषिक काही सांगत असतील तर त्यात जे कठीण व भारदस्त व सर्वांस समजण्यास मुश्किल अशा शब्दांची पेरणी करतील त्यांना विद्वतेविषयक सुगीचे दिवस लवकर दिसतील! तर ते एक असो. आम्ही विद्वान आहोत हे इतरांस पटवून द्यावे कसे या बद्दलच्या गोंधळाने आम्ही मध्ये मध्ये असे ऑफ द ट्रॅक जात असतो. त्यामुळे परत मूळ विषयाकडे..

जगाच्या आरंभी काहीतरी कशासतरी मूल्य म्हणजे किंमत दर्शवणारी योजना आखण्यात आली असावी. कदाचित तेव्हा मनुष्यमात्रासही नि मानवाच्या आयुष्यासही काही किंमत द्यायची पद्धत असू शकेल. कारण तेव्हा जग इतके आजच्यासारखे पुढारलेले नव्हते. त्या मागास युगात मानवी आयुष्यासही किंमत दिली गेली असेल पण हळूहळू उत्क्रांत होत मौल्यवान तो खरा पैसाच हे माणसास उमगले असावे. जडजवाहिर नि सोनेनाणे, त्यांची किंमत नि जगाचे व्यवहार सुरळीत घडवून आणण्याची क्षमता याबद्दल माणसास जाणीव कधी झाली असावी? सोन्याची नि चांदीची चमक पाहून डोळे दिपले असतील. किंवा पैपैशाने एखाद्या अख्ख्या माणसाची नीयतही खरेदी करता येते हे पाहून ती जाणीव झाली असावी. काही असो, आता एखाद्याची नीयत ही स्वस्तात उपलब्ध होऊ शकते. जगभर वाढत्या महागाईत स्वस्ताई दोन गोष्टींची, एक म्हणजे ती नीयत आणि दुसरे, काही एकांची आयुष्ये. म्हणजे जगात सारेच समान असतील तरी काही अधिक समान

असतात असे म्हटले जात असेल, तर त्यातील उतरंडीत पायाभूत असणारे 'इसम' प्रकारात मोडेल असे मानवी आयुष्य स्वस्तात उपलब्ध आहे हल्ली. आता ह्या स्वस्ताईबद्दल स्वत:ची पाठ कोण्या सरकारने आपल्याच कुठल्याशा यंत्रणांकरवी थोपटून न घेतली म्हणजे मिळवले! असो. पण

या विवेचनातून आमच्या काही अर्थविषयक धारणा स्पष्ट झाल्या असाव्यात असे आम्हास स्पष्टपणे वाटते. म्हणजे एक तर जगात मौल्यवान गोष्टीचे मोल तिच्या आर्थिक मूल्यावरच ठरते आणि जगात सारे महाग होत असताना काही मानवी आयुष्ये तरी स्वस्त करण्याचे श्रेय विविध सरकारांना द्यायलाच हवे.

अर्थशास्त्रात क्रय शक्तीचा उल्लेख होत असतो. पैपैशाची क्रय शक्ती दिवसेंदिवस घटत जाते असे दिसून आले आहे. दाम करी काम हे खरेच, पण सुदाम्याकडे दाम नसूनही प्रत्यक्ष भगवान कृष्णाने त्याचे आदरातिथ्य केल्याची गोष्ट वाचली आहे आपण. तिथे दाम काम करत नसेलही पण ही पुराणकालीन बाब. दिवस बदलत बदलत इतके बदलले की सुदाम्यासही आपले ते कृष्णाकडून मिळालेले सोन्याचे पोहे खुल्याबाजारात विकून सोन्याचा भाव चढा असताना पाहून प्रा ॅफिट बुकिंगचा मोह व्हावा. तेव्हा एखाद्या गोष्टीची खरेदी विक्री होताना लागणारे दामाचे प्रमाण त्या दामाच्या क्रयशक्तीच्या विपरीत प्रमाणात असते! हे आम्ही आमची ओरिजिनल थियरी म्हणून सांगू शकतो. कारण, जरी 'महागाई जास्त असेल तर रूपयाची क्रयशक्ती घटत जाते' इतकाच त्याचा अर्थ असला तरी आम्ही बऱ्यापैकी शब्दच्छल त्यात केला आहे! थियऱ्यांची अभ्यासू मांडणी विद्वानलोक अशाच पद्धतीने करत असतात नाही का?

बाकी शेअर बाजार नि इतर बाजारांबद्दल आमची मौलिक मते आहेतच. आम्हाला वित्तविषयक बित्तंबातमी बाजारातून मिळत असते. म्हणजे बाजार भाव पाण्यातून मासोळीने उसळी मारावी तसे वर काय जातात.. श्रावणात तेच उतरतात काय. अर्थात तेव्हा परमेश्वराचा प्रथमावतार बाजारात उपलब्ध असेल तरच! शेअर मार्केटात ही अशीच उसळी नि आपटी, म्हणजे भरती नि ओहोटी होत राहते. कधी तर काही शेअर आपल्या पैशांसकट दिसेनासे होतात. सुक्या मासळीचा वाटा बोहनीच्या वेळी हात मोकळा सोडत कोळणीने आपल्या पिशवीत टाकावा तसे काही पेनी स्टाॅक मिळतात. त्या सुक्या मासळीचे सुग्रास कालवण बनावे नि जिव्हा तृप्त करून जावे तसे काही स्टाॅक्स चढ चढ चढतात नि मालामाल करून जातात. तर काही वेळेस मासळीने पदरी निराशा टाकावी तसे लाखाचे बारा हजार करून जातात. आम्ही तर म्हणतो जगात बेभरवशाच्या टाॅप गोष्टीत एक तर माणूस नामक प्राणी आहे नि दुसरा शेअर बाजार आहे! अर्थात माणसाइतकी प्रगती याही बाबतीत अन्य कोणी करू शकणार नाही हे ही खरे!

पैपैशाबद्दल कोणी कोणी काय काय सांगून गेलेत. मागे आमचा एक मित्र तुकाराम नि रामदासांसारख्या संतांना दोष देत म्हणालेला, हे संत लोक सारे सत्य आधीच सांगून गेलेत. आता आपल्याला स्वत:हून झालेच काही सत्याचे दर्शन तरी त्यात नवे म्हणून काय ते सांगणार? तसे आम्हासही वाटते. मोठमोठे लोक काय काय सांगून गेलेत. कुणी म्हणून गेले, पैसा भगवान नहीं, पर भगवानसे कम भी नहीं! कुणी म्हणाले, केराची टोपली न पाहिलेला कागदाचा तुकडा म्हणजे पैसा! कुणी म्हणे, भरलेला खिसा दुनिया दाखवेल नि रिकामा खिसा दुनियेतील माणसं! कुणी सांगून गेलंय, सबसे बडा रूपय्या! आम्ही म्हणतो जगात सगळीकडे गडबड आहे, गोंधळ

आहे, गोंगाट आहे. कर्णकर्कश्श नि कर्णकटू आवाज आहेत. जिथे पहावे तिकडे आवाजच आवाज. तरीही या आवाजी जगात सर्वात मोठा आवाज कुणाचा असेल तर तो याच पैशाचा. नाण्याचा छनछनाट हेच सर्वात मधुर संगीत. नोटांच्या थप्प्यांवर बैठक ही जगातील सर्वात आरामशीर बैठक! मग भले ही तिच्या सुरक्षेच्या चिंतेने तिच्या मालकाची झोप मोडो! देवाच्या काठीला आवाज नाही म्हणतात, पण ती गोष्ट मरणोपरान्त. जिवात जीव असेतो आवाज एकच, सुमधुर संगीत एकच, गरगरीत वाटोळा रूपया, ज्याच्याविना कुणाकुणाचे वाटोळे होते! जगात पैशाइतकी किंमत फक्त पैसेवानासच आहे. पैलवानाहून ताकद पैसेवानात आहे. पैशाचा उद्गम वगैरे फिजूल बाबी न बघता पैसेवानांचा पैसा म्हणजे या जगातला खणखणीत बंदा रूपया!

अर्थसंकल्प आला की सारे अर्थ नि अनर्थ तज्ञ सरसावून बसतात. आमच्याच म्हणण्यानुसार एक अर्थशास्त्र अनर्थ घडवू शकते. म्हणजे एखाद्या सरकारची गुणवत्ता याच अर्थशास्त्राधारित सफलते वा विफलतेवर आधारित जोखली जाऊ शकते. अर्थात अर्थसंकल्पात खरोखरीच काय आहे त्यापेक्षा राजकीय दृष्ट्या कोण कोठे आहे यावर अवलंबून प्रतिक्रिया दिल्या जातात. पण आम्ही म्हणतो याबाबतीत 'ग्यानबा' सर्वात मोठा. ग्यानबाचे अर्थशास्त्राचे ज्ञान सर्वात मोठे! आपला ग्यानबा महिन्यामहिन्यात पैशांचा हिशेब ठेवत नाही. एक दिवस अचानक घरातील पैसे मोजावयास घेतो. पैपैचा हिशेब लावता लावता थकतो. बायकोला विचारतो, खर्च झाला कुठे? इतकाच पैका बाकी? बायको म्हणते, म्हागाई दिसती न्हाई का? मग ग्यानबा हिशेब आवरता घेत म्हणतो, जे आहेत ते बाकी, बाकी रक्कम खर्च, नि दोघांची गोळाबेरीज म्हणजे आपली आमदनी! ग्यानबाच्या अर्थशास्त्रात म्हणून

संकल्प असा नाही! फक्त उरलेली रक्कम म्हणजे 'बाकी' आहे! तो म्हणतो ते खरेच! बाकी अर्थशास्त्रात अजून आहेच काय? आम्ही वगळता बाकी विद्वानांनी ध्यानात घ्यावी ही बाब, कारण आम्हाला याचे ज्ञान ग्यानबाकडून मिळाले आहे आधीच! आणि आमचे ठाम मत हेच आहे अर्थसंकल्प नाही तर ग्यानबाचे अर्थशास्त्रच ह्या देशातील बहुसंख्यांस तारून नेत असते!

आम्हास वाटते इतक्या साऱ्या विवेचनानंतर नक्कीच आमच्या विद्वत्तेबद्दल खात्री पटली असणार. एकतर विषय अर्थशास्त्राचा नि त्यात ही विद्वत्ताप्रचुर मांडणी. विद्वत्ताप्रचुर म्हणजे विवेचनाअंती विचारात पडावा कुणीही वाचक. कुणी कुत्सितपणे म्हणेल, वाचक विचारात तर पडेलच पण इतक्या सर्व अर्थशास्त्रीय पाल्हाळाचा अर्थ नक्की काय याबद्दल! बोलोत बापडे. करा टीका! अजूनतरी आमच्यासारख्या सामान्य माणसावर टीका करण्याचे स्वातंत्र्य टिकून आहे. म्हणजे आम्ही कुणी राजकीय नेता वगैरे नाही की ज्याच्यावर सार्थ वा अ-सार्थ टीका केल्यास अनर्थ ओढवावा. तेव्हा टीका करा.. काही करा.. आमची दखल घेण्यास तुम्हाला आम्ही भाग पाडलेय हाच त्याचा अर्थ!

थोडक्यात विद्वज्जनांबद्दलच अशी मतमतांतरे होतात, होऊ शकतात, होत रहातात. ती येथे होताना दिसेलच.

.. तशी ती दिसली म्हणजे आमच्या विद्वत्तेची आम्ही सोडून इतरांसही खात्री पटलीच समजा!

# *सामर्थ्य आहे बडबडीचे..*



मी बडबड्या आहे, बोलका आहे, गप्पिष्ट आहे, बोलभांड आहे.. वगैरे बरेच प्रवाद मला ओळखणाऱ्यांत आहेत. मी एरवी बोलका असलो तरी या बाबतीत न बोलून शहाणा आहे. बाकी भाषेचे काय? माणूस मरणाची क्रिया एकच असली तरी तिची बातमी होताना कुणी गचकतो, कुणी नुसताच मरतो, कुणी देवाघरी जातो, कुणाचे होते निधन, कुणी निवर्ततो, कुणाचे देहावसान होते.. त्या त्या व्यक्तीच्या जीवाच्या अंताआधीच्या जिवंतपणातील कर्तृत्वावर भाषेतील शब्दप्रयोग ठरतो. तसेच हे. माझ्याबद्दल लोकांचे मत काय यावर कुणी मला बडबड्या म्हणेल, गप्पिष्ट म्हणेल की बोलभांड म्हणेल हे ठरेल!

तर या भाषा किती गमतीदार असतात नाही? ज्या भाषेत वचने किं दरिद्रता तिच्यातच मौनं सर्वार्थ साधनं म्हटले गेले आहे! अगदी संस्कृतासारख्या देवभाषेत असा गोंधळ असल्याने ती पूर्वी सरकार दरबाराची भाषा असणार हे पटणे अवघड नसावे! पण त्यामुळे क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे म्हणतानाच कुणी म्हणेल, सामर्थ्य आहे बडबडीचे तर यावर कोण कसा आक्षेप घेऊ शकेल?

माझा हा बडबडा स्वभाव म्हणूनच माझ्या सामर्थ्याचा निदर्शक आहे. बोलणाऱ्याचे दगडही खपतात नि न बोलणाऱ्याचे सोनेही खपत नाही म्हणे. म्हणजे या हिशेबाने मी किती दगड विकले असतील विचार करा! अर्थात मी कुठल्या बांधकाम क्षेत्रात खडक विभागात वगैरे नाही. नाहीतर मी 'परफेक्ट आहे हो हा दगड. अगदी याच्यावर डोके फोडाल तर डोके फुटेल पण न ह्यास तडा जाईल न पाझर फुटेल.. अगदी गॅरंटीड दगड आहे..' म्हणताना मी दिसलो असतो. कारण बोलणे हा माझा स्थायीभाव आहे. आणि अन्य कुठल्या भावाच्या अभावाने तो जरा जास्तच उठून दिसतो हे खरे! ज्याला कुणास माझ्याबद्दल थोडी आत्मीयता आहे त्यास जरा बोलका स्वभाव वाटतो, शेवटी आपला तो बाब्या या वचनास जागायला हवेच त्यांनी. तर बाकीचे म्हणजे दुसरे, मला कार्टे समजणारे.. 'बोलभांड आहे नुसता' म्हणतात मला. जसं काही बोलून बोलून भांडायला मीच बोलावलं असावं! मी तर म्हणतो, तेच भांडकुदळ कुठले! तर थोडक्यात काय मी बोलका आहे, बडबड्या आहे किंवा बोलबचन आहे असे माझे वर्णन कोणी करू शकेल.

पण त्यात चुकीचे काय आहे?

म्हणजे बोलण्यात चुकीचे काय आहे? या जगात इतके सारे प्राणी आहेत. बाकी सजीव म्हणजे झाडेझुडपे वगैरे सोडून देऊ. पण प्राण्यांपैकी कुणी बोलत का नाहीत? नुसतीच कोल्हेकुई किंवा कुत्र्याचे भुंकणे वगैरे काय बोलण्याच्या व्याख्येत येते? अगदी बोलका पोपट म्हटला तरी कदाचित तो चार शिकवलेले शब्द पोपटपंची करून बोलत असेल पण माणसासारखे उत्स्फूर्त त्यास बोलता येते? असं असताना माणूस प्राण्याने बोलू नये? उगाच शाळेत 'गप्प बसा' हा मंत्र पढवला जातो त्याचे

पालन आयुष्यभर करत बसावे? तसेही शाळेतील शिकवलेली सुभाषिते ही शाळकरी वयापुरतीच असतात.. शाळा सोडून बाहेरील जगात जाताना ती विसरावीच लागतात.. तेव्हा ही 'गप्प बसावे' ची शिकवण शाळा सोडताच विसरावी हेच खरे. अर्थात शहाणपणा दाखवून मी ते विसरलो आणि माझी बोलण्याची सवय मी सोडली नाही. तसा मी वयाच्या दुसऱ्या वर्षापासून बोलत सुटलोय. जन्मानंतरची पहिली दोन वर्षे वाया गेली याचं अजूनही वाईट वाटतं. पण आता त्याला इलाज नाही. मीच म्हटलंय एका ठिकाणी, गेलेली वेळ परत येत नसते, तेव्हा त्याबद्दल शोक करण्यात आजचा वेळ का दवडावा? आता मी हे सांगतोय म्हणून आश्चर्य वाटून घेऊ नका. हेच पूर्वी काही महान लोक सांगून गेले असतील पण म्हणून हलवून खुंटी बळकट का करू नये? आणि महान व्यक्ती दरवेळी वेगवेगळे ते काय सांगणार? असं म्हणतात जगात तशी चिरंतन म्हणावीत अशी सत्ये कमीच आहेत! त्यातील हे एक! तर मुद्दा हा की गेलेल्या वेळेबद्दल शोक करण्यात वेळ दवडू नये आणि कामास लागावे!

.. म्हणजे बोलणे सुरू ठेवावे!

नशिबाने पुढे मी योग्य लायनीत पडलो. म्हणजे जिथे बोलणे हेच भांडवल अशा व्यवसायात. किंवा धंदा म्हणा ना. खरंतर धंदा नि व्यवसाय समानार्थी शब्दच आहेत पण तरीही त्यात फरक असतोच. पण विषय तो नाही. आणि वायफळ बोलण्याची सवय मला नाही! तर माझा व्यवसाय म्हणजे जिंदगी के पहले भी और बाद में भी असा! जनम जनम का साथ म्हणावा का? म्हणू शकतो कुणी! कारण जिंदगी के साथ जित्या जागत्या विमाधारकाबरोबर मला बोलत रहावेच लागते. अहो विमा पाॅलिसी विकणे काही खायचे काम नाही! कुणाला आपण सरळ,'समजा तुम्ही

उद्या गचकलात तर बाकीच्यांचे काय याचा विचार केला आहेत का?' असे सांगत पाॅलिसी विकू शकत नाही! म्हणजे सांगायचे किंवा म्हणायचे तेच असते पण या भाषेत नव्हे! कडू गोळीस बाहेर गोड आवरण चिटकवावे तसे या सत्यास बाहेर भाषिक आवरणाचा गोडवा आणावा लागतो! हे 'जिंदगी के साथ भी' वाले प्रकरण. मग जिंदगीके बाद? हा विमा एजंट काय प्रत्येक मरणाऱ्याबरोबर वर जाऊन येईल की काय? पण परत, ही बोलायची पद्धत एक! शेवटी मी म्हटले तसेच, बोलण्याशिवाय या दुनियेत काही खपत नाही! आणि शब्दांशिवाय दुसऱ्या कशाचा खप ही नाही हे ही खरे!

मी तसा बोलत आलोय, बोलत राहिन ही. बोलता बोलता हे दिवस निघून जातील. अर्थात माझ्या बोलण्याने मी जमा केलेल्या असतील त्या विम्याच्या पाॅलिसीज नि त्यावरील कमिशन वगैरे. पण नुसत्या बोलण्याने आजवर कित्येक पुढारी घडले. भाषेच्या जोरावर जनसमुहास संमोहित करत बोलाचिच कढी नि बोलाचाच भात आग्रह करकरून खाऊ घालणारे कित्येक होऊन गेले, आता ही आहेत, पुढेही होतील. याच वाचेच्या सामर्थ्याने कित्येक राजकारणी जनतेवर राज्य करतात. नि संमोहित जनता त्यांना स्वखुशीने राज्य गाजवू ही देते. तात्पर्य काय, शेवटी बोलणे हे महत्वाचे! बोलणे, बोलत राहणे, मनास येईल ते बोलणे अथवा न बोलणे, वारंवार बोलत खुंटी हलवत बळकट करणे, रेटून बोलणे अथवा गोबेल्सचा आदर्श ठेवत खोटे बोलणे पण आत्मविश्वासाने नि सतत तेच बोलणे वगैरे विविध पातळ्यांवर पुढारी लोक वाच्यार्थानेच वाचेचा प्रयोग करून स्वत:च वाचवतातच नव्हे तर पुढे घेऊन जातात. पुढारी लोक या बाबतीत पुढारलेलेच! कुणी म्हणेल


बोलणे नव्हे, तर त्या मागचा विचार महत्वाचा. खरे असेल ही ते. माणसाचे विचार त्याला घडवतात, कधी बिघडवतात. पण राजकीय लोकांच्या बाबतीत विचार एक नि बोलणे दुसरे.. लोक वरलिया रंगालाच भुलतात तेव्हा हा भाषेचा वरलिया रंग चढवणारी वाचा महत्वाची. पण हे मोठ्या लोकांच्या मोठ्या बातांबद्दल.. साॅरी, बोलण्याबद्दल. माझी बोलण्यावरील श्रद्धा मात्र अशी कुठलीही काहीही मोठी जागा मिळण्याची शक्यता नसूनही निष्काम मनाने बोलत राहण्याबद्दल आहे. अखंड बोलत बातो बातों में जे जे होऊन जाईल त्याबद्दल!

देवदत्त स्वरयंत्र नि जीभ, दात, टाळू वगैरेंमुळे हे बोलणे शक्य होते असे वैद्यकशास्त्र म्हणते. मेंदूमध्ये त्यासाठी विशिष्ट केंद्रही आहे म्हणे. म्हणजे केंद्र सरकार म्हणावे का? तिकडून आदेश आला की उचलावी जीभ नि लावावी टाळूला! हे म्हणजे खरेच केंद्र सरकारांसारखे झाले! याच बोलण्याच्या केंद्राचा विचार करणाऱ्या मेंदूशी संपर्क असतो म्हणे. आता सगळेच या विचार करणाऱ्या मेंदूला कन्सल्ट करून बोलतात का हे ठाऊक नाही पण ती एक सोय उपलब्ध करून वैचारिक विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न माणसाच्या घडणीत झाला असावा. पण सत्ता नि तिच्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टींचा मोह कोणास सुटला आहे? तेव्हा वैचारिक मेंदूशिवाय काम चालत असेल तर डायरेक्ट बोलण्याचे केंद्र आपला कारभार चालवल्याशिवाय कसा राहिल? थोडक्यात एकूणच सामाजिक व राजकीय व्यवस्थेसारखीच ही स्थिती आहे म्हणा! त्यामुळे मी तसा पहिल्यापासूनच मनात येईल ते बोलून त्या विचारांचा विचारकेंद्रास न विचारता निचरा करत असतो. कुणी यास स्पष्टवक्तेपणा म्हणेल कुणी फटकळ पणा तर कुणी उद्धटपणा! बघा, परत हा

भाषा भेद आहेच. विचार केंद्र ते वाचा केंद्राचा प्रवास तब्बल दहा सेकंदाचा असतो म्हणतात. त्यामुळे कुणी म्हणेल रागाने काही बोलण्याआधी एक ते दहा आकडे मोजा. पण मी उगाच तेवढा अमूल्य वेळ न दवडता जीभ उचलून टाळूला लावत असतो. शेवटी आयुष्य मर्यादित आहे. वेळ कमी नि बोलायचे खूप आहे. तेव्हा लवकरात लवकर बोलून घेतलेच पाहिजे. विचार केंद्रास उगाच जास्त कामास का लावा?

शेवटी काय सामर्थ्य आहेच बडबडीचे, तेथे बोललेचि पाहिजे! बोलण्यास पैसे पडत नाहीत. तेव्हा बोलत राहतो मी, बोलतच राहतो. कुणी काय म्हणेल याची पर्वा न करता. मनातले विचार शब्दरूपाने बाहेर आले नाहीत तर त्यांचा विसर्ग कसा व्हावा? अबोल जनांस लोक आतल्या गाठीचा वगैरे म्हणतात. त्यापेक्षा मी ती गाठ रीतसर उघडून बसतो. बोलत सुटतो. कुणी बडबड्या म्हणा, कुणी बोलभांड, पण उगाच कुणी 'न बोलून शहाणा' वगैरे बोल नको लावायला! काय?

# *माझे होयबा धोरण!*




खरं सांगतो..

या बाबतीत मी उगाच नाही म्हणणार.. नाय बा! कारण माझं धोरणच आहे खरे, होयबा!

होयबा म्हणजे समोर जे जे वरिष्ठ व जिथे जिथे मी कनिष्ठ तिथे तिथे नो आर्ग्युमेंटस्! फक्त 'हो' म्हणायचे. समोर कोण आहे त्यावर ते अवलंबून.. 'ते' म्हणजे 'होय' म्हणणे नव्हे.. तर 'यस सर' म्हणावे की 'तू म्हणशील तसे' म्हणत सपशेल शरणागती पत्करावी हे समोरील बा ॅस च्या टायपावर अवलंबून. बा ॅस ऑफिसातील की घरातील इतकाच फरक!

अगदी लहानपणी हे होय म्हणण्याचे बाळकडू मी पाजून घेतले. पाजून घेतले हे क्रियापद थोडे विचित्र वाटेल. पण ही क्रिया विचित्र नाही! मातृपितृ आज्ञा पालन हा माझ्या लहानपणीचा एक मुख्य गुण. कोणी मोठ्याने सांगावे नि मी निमूट पालन करावे. 'मोठ्याने' म्हणजे मोठ्या आवाजात नव्हे! तसे सांगण्याची वेळच मी येऊ देत

नसे. मोठा माणूस मोठा आहे इतके पुरे. मग त्याचे ऐकून वाद न घालता आज्ञा पालन.. उगाच 'हे का?' 'असेच का?' 'कशाला?' असले फालतू प्रश्न मला पडत नसत. त्यांनी सांगितले.. अमुक कर.. मी अमुक करत असे.. तमुक म्हटले तर तमुक! उगाच प्रतिप्रश्न कशाला? या प्रश्नाप्रश्नांमुळेच तर जगात कित्येक समस्यांचा उद्भव झाला आहे हे स्पष्ट दिसत असताना 'होय' म्हणत त्यांनी सांगितल्याप्रमाणे करणे ह्या माझ्या बाण्याने मला हात दिला. नि माझी प्रगती होणे हा फक्त काळाचा भाग राहिला.. म्हणजे इट वा ॅज जस्ट अ क्वेश्चन ऑफ टाईम!

जसजसा मी वयाने मोठा होत गेलो.. तसतशी माझी इतरही बाबीत प्रगती होत गेली. मीच स्वत: मोठा झालो तर मला ही माझे निमूट ऐकणारे होयबा मिळतील याची खात्री होती..झालेही तसेच! अर्थात तसे नसणाऱ्यांस मी तांदळातल्या खड्यासारखे बाहेर काढले हा भाग वेगळा! थोडक्यात हे होयबा धोरण फळास आले.. दोन्ही बाजूंनी!

माझ्या हाताखाली होयबा आले तरी ही अर्थात मी माझे यशस्वी नि ट्राइड अँड टेस्टेड 'होयबा धोरण' सोडलेले नाही. कारण माझ्या हाताखाली माझ्या आज्ञेचे पालन करणाऱ्या होयबांचे मी पालन केले असले तरी माझे ऑफिसात माझे वरिष्ठ तर आहेतच. आणि घरचे काय? आईवडलांच्या इच्छेस मान देऊन मान वाकवून नि तुकवून उभा असताना गळ्यात जिने वरमाला घातली ती साता जन्माची जाया या जन्मात देखील पर्मनंट बा ॅसपदावर आहेच.

पण थोडक्यात काय, तर हे होयबा धोरण माझ्या प्रगतीचे रहस्य.. 'बूस्ट इज द सिक्रेट ऑफ माय एनर्जी' अशी जाहिरात येई.. तसे 'सेईंग यस्स इज द सिक्रेट ऑफ माय प्रगती!' अगदी लहानपणापासून! माझ्या करियरच्या प्रगतीत मी माझ्या वरिष्ठांस प्रिय झालो. त्यांना न कळेल असे त्यांच्या पुढे पुढे करणे, त्यांची स्तुती करत राहणे ही होयबानुषंगिक धोरणे अजून जलद फळ देतात हा माझा अनुभव. पण मी पाहिलेय त्याप्रमाणे कित्येक जण मोठेपणी हे शिकतात. नोकरीत हे लोक लागले की आजूबाजूस आपल्या पुढे जाणाऱ्यांकडे पाहून आधी त्यांचा हेवा यांना वाटतो, मग त्यांना थोड्याफार शिव्या घालत आपल्या ताठ कण्याचे कवतिक करत हे लोक काही वर्षं काढतात. मग एकदा ही 'सिस्टीम' ध्यानी आली की साहेबाचे लांगूलचालन वगैरे करायला लागतात.. तोवर कित्येक मौल्यवान वर्षे निघून जातात. इतर कित्येक जण कानामागून येत तिखट होत पुढे निघून गेलेले.. स्वत:च्या मागासलेपणाला कारण ठरणाऱ्या तथाकथित स्वाभिमान वगैरे अवगुणांस बोल लावत हे लोक वठणीवर येतात.. होयबा धोरणाचा स्वीकार करत हळूहळू मार्गक्रमणा करायला लागतात.. 'देर आए पर दुरूस्त आए' असे स्वत:च्याच मनाचे समाधान नि सांत्वन करत! पण मी मात्र दुनियादारीत आधीच हुशार. अगदी लहानपणापासून आज्ञाधारकपणा हा गुण अंगी बाणवल्याने माझा सरसर उत्कर्ष होणे स्वाभाविक होतेच. पण घरातही हेच धोरण ठेवल्याने कौटुंबिक आघाडीवरही बिघाडी न होता शांतता नांदू शकली.

बाकी 'होयबा धोरणा'च्या जास्त डिटेल्स मध्ये जाण्याची गरज नसावी. वरून आलेल्या हुकुमाचे 'होय' म्हणत तातडीने पालन.. इतकेच हे धोरण! हुकूम 'हे' करा

म्हणून असेल तर 'हे'च करावे, 'ते' करा म्हणून असेल तर 'ते'! इतके सोपे बहुदुधी आखूडशिंगी गायीसारखे बहुगुणी होयबा धोरण हे व्यक्तिगत कल्याणासाठी रामबाण उपाय मानला जायला हवे. काही तथाकथित स्वाभिमानी व ताठकणाभिमानी यावर प्रश्नार्थक भुवया उंचावतील ही. प्रश्न उपस्थित करणे हाच ज्यांच्या अपयशी जीवनाचा पाया असेल तर त्यांच्याकडून काय अन्य अपेक्षा करावी? माझे एकच सांगणे आहे, गड्यांनो नकारात्मकता फेकून द्या. सकारात्मक वागा. 'होय' म्हणायला शिका. होयबा होण्याचे व होयबा धोरणाचे फायदे अगणित. नुकसान म्हणावे तर काहीच नाही.. असे असताना जीवनोद्धाराची ही सोपी सुलभ जीवन पद्धती अंगीकारा.

अर्थात इतरेजनांस भल्याचे चार शब्द सांगावे इतकाच उद्देश. त्यांना हे पटो न पटो. सवयीने ते यावरही प्रश्न उपस्थित करोत.. पण निष्काम वृत्तीने मी हे 'जे जे आपणासी ठावे' ते इतरांस सांगत आहे! होयबा धोरण हे सामाजिक वंगणासम आहे. प्रश्न नि प्रतिप्रश्नाच्या घर्षणाने वाया जाणाऱ्या ऊर्जेची बचत करणारे, तो खडखडाट कमी करणारे. या वंगणाचा उपयोग करावा. सामाजिक, वैयक्तिक उन्नती साधून घ्यावी.. भौतिकशास्त्रात वंगणाचे यंत्रासाठी होणारे फायदे शिकवले जातात, तसे हे समाज यंत्राच्या सुरळीत चलनासाठी होणारे फायदे. हे यंत्र नीट चालले तर सारे काही शांत शांत.. खडखडाटाविना! अशी सकारात्मकता अंगी बाणवली, रूजवली तर समाजाचे भले होण्यास वेळ तो कितीसा लागेल?

- आणि शासनास तरी दुसरे काय हवे असते? वरिष्ठांचा हुकूम बिनतक्रार, बिनाप्रश्न नि विनाविलंब पाळणारी यंत्रणा! त्यात प्रश्न नि प्रतिप्रश्नांच्या शंकाची कुसळे

न शोधणारी. शासनाच्या प्रशासनात गतिमानता आणायची असेल तर ही होयबांची यंत्रणा कामी येईल की नाही?

माझ्या होयबा धोरणाची फळे मी चाखतो आहे, चाखत राहिन पुढे ही. सर्वांनीच ते अंगीकारले तर समाजरथ प्रगतीपथावर सुसाट सुटेल.. खात्री आहे माझी. खरेतर या बाबत एक कार्यगट बसावा, समिती, उपसमिती नेमली जावी, हवी असल्यास उपउपसमिती देखील. तितकीच काही अधिकाऱ्यांच्या भत्त्यांची सोय.. पण मुद्दा वेगळा आहे. तर या समितीने तत्काळ 'राष्ट्रीय होयबा धोरणा'चा मसुदा बनवायला घ्यावा. अशा समितीवर झोकून देऊन काम करायला मी तयार आहे.. अगदी कुणाच्याही हाताखाली! शेवटी समितीच्या मेंबरांचे काम ही तेच ना.. यस सर म्हणावे नि समितीचे काम पुढे चालत रहावे!

शासनास माझी ही विनम्र सूचना आहेच.. त्यांनी बोलावणे पाठवल्यास 'यस सर' म्हणत सेवा देण्यास हा बंदा तत्परतेने हाजिर आहेच!



# सश्रद्ध मी! अंधश्रद्ध मी!



श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात खूपच बारीक सीमारेषा आहे म्हणे! मला तर हीच एक अंधश्रद्धा वाटते. उगाच एखाद्याच्या श्रद्धेस अंधपणाने अंधश्रद्धा म्हणून हिणवावे का? माझ्यामते तर साऱ्या अंधश्रद्धा या खऱ्याखुऱ्या श्रद्धाच आहेत. उगाच कुणी अश्रद्ध व्यक्तीने श्रद्धेस अंधश्रद्धा म्हटले म्हणून ती अंधश्रद्धा होते थोडीच.

थोडक्यात काय तर अंधश्रद्धा नामक कोणतीही बाब या जगात अस्तित्वात नाही. माझे हे स्पष्ट मत आहे.

आणि त्याला नुसताच माझा कित्येक वर्षांचा अनुभव साक्षीस नाही, तर गेल्या कित्येक पिढ्यांपासून चालत आलेल्या या श्रद्धा आहेत. त्यांना वर्षांनुवर्षांचा इतिहास आहे. काळाच्या कसोटीवर तावून सुलाखून घेतल्या गेलेल्या या श्रद्धा आहेत. आता आपली जातिव्यवस्था बघा. शतकानुशतके चालत आलेली नि कालौघातही नष्ट होऊ न शकलेली. तसेच हे! उगाच काही स्वत:स प्रागतिक नि पुरोगामी म्हणवणारे जातिव्यवस्थेसारख्या समाजास स्थायी स्थैर्य पुरवणाऱ्या व्यवस्थेस मिटवण्याच्या बाता करतात.. तशाच यांना या श्रद्धा डोळयांत खुपतात. पण तरीही सर्व ढुढ्ढाचार्यांच्या नाकावर टिच्चून ह्या साऱ्या बाबी दिमाखाने उभ्याच

नव्हे तर मिरवताना दिसतात. का मिरवणार नाहीत? आपले नाणे खणखणीत असेल तर ते वाजवून दाखवणारच कोणी! बहुसंख्यांस पटणाऱ्या श्रद्धांस अल्पसंख्य तथाकथित बुद्धीप्रामाण्यवाद्यांनी चिडवावे नि डिवचावे, ते का? अर्थात आमचा समाज अति विचारी आहे. ढाई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होय.. किंवा जे का रंजले गांजले.. त्यासी आपुले म्हणणाऱ्यास साधु समजावे वगैरे शिकवणूक देणाऱ्या मोठमोठ्या संतांना ज्याने मानले नाही ते या अल्पमती बुद्धिवाद्यांस काय दाद देणार? त्यामुळे संतमहंतांस देव्हाऱ्यात ठेवून नि अशा बुद्धिवाद्यांस दुर्लक्षित ठेऊन आमचा समाज आपल्या श्रद्धांप्रती अतिश्रद्धाळूच राहिला आहे! अशा समाजाचा एक भाग मी! गर्व से कहो हम श्रद्धावान है म्हणणारा.. कुणी काही म्हटले तर अगदी 'गर्व से कहो हम अंधश्रद्ध हैं' म्हणावयास ही तयार असणारा.

का नसावा? माझ्या पाच मोठ्या बहिणींपाठी नवसासायासाने झालेला मी. मी 'तो' च्या ऐवजी 'ती' झालो असतो तर माझे नामकरण 'नकुशी' होण्याची खात्री होती. पण देवीस वाहिलेल्या बोकडामुळे तर माझा जन्म झाला. तेव्हा ह्या जन्मासाठी मला ऋणी राहणे भाग आहे. आमच्या गावची देवी अति कडक. त्यामुळे पहिल्या पाच बहिणींच्या जन्माच्यावेळी नवसात काहीना काही त्रुटी राहिल्या असाव्यात. पण माझ्यावेळी देवी पावलीच. बरं, माझ्यावरची ही छत्रछाया जन्मापर्यंतच असती तर ठीक. पण त्यानंतर पदोपदी मला तिचा प्रत्यक्ष अनुभव येत असताना या सर्वांस अंधश्रद्धा म्हणून त्या शक्तीचा अपमान मी का करावा? अगदी माझ्या दहावीच्या परीक्षेचे उदाहरण. परीक्षेआधी एक महिना मी अनवाणी मंदिर प्रदक्षिणा करीत असे. देवळातच प्रदक्षिणा घालताना कुणाचे तरी पडलेले नि मला सापडलेले लकी पेन मी

सांभाळून ठेवलेले, तेच वापरत असे. देवास एक नारळ फोडण्याचा शब्ददेखील मी दिलेला. माझा जन्म शनिवारचा. मारूतीची माझ्यावर कृपा. त्या बदल्यात दर शनिवारी एक रूईचा हार नि तेल अर्पण केलेले बजरंगबलीस. या सर्वांनंतर प्रत्यक्ष परीक्षेत माझ्यासमोर एक स्का◌ॅलर यावा.. का◌ॅपी करण्याची संधी मला मिळावी नि ती करताना पकडले न जावे म्हणून प्रत्यक्ष देवाने माझ्याभोवती जणू कवच उभे करावे.. एक्केचाळीस टक्क्यांनी मी पहिल्याच प्रयत्नात दहावीच्या अति कठीण परिक्षेचा किल्ला सर करावा.. देवदयाच ती! त्या माझ्या अथक प्रयत्नांस यश मिळण्यास कारण अशा सर्वांस कुणी अंधश्रद्धा का म्हणावे? आणि मी ते का मान्य करावे? अर्थात हे फक्त उदाहरणादाखल. पदोपदी मला असा प्रत्यय येत असताना माझी श्रद्धा दृढ होण्यास प्रत्यवाय नसावाच!

मी तर घरातून निघताना राहू काल पाहतो. तिथीनुसारच कामे करतो. पवित्र दिवसांतच नव्हे तर त्या दिवसाच्या विशिष्ट वेळेतच सारे काम उरकावे हे कटाक्षाने पाळतो. मुहुर्तानुसार कामे करावीत म्हणून माझे खास ज्योतिषी मला सल्ला देतात तसेच वागत असतो. फॅमिली डा◌ॅक्टरपेक्षा हे फॅमिली ज्योतिषी अधिक महत्वाचे. अगदी माझ्या सौभाग्यवतीच्या प्रथम डिलिव्हरीतही त्या ज्योतिषाचार्यांनीच तारून नेले. खेदाची बाब म्हणजे डा◌ॅक्टर नाही म्हणत असताना मुहुर्तानुसार डिलिव्हरी पुढे ढकलली.. यात प्रथम मूल दगावले, पण ज्योतिषाचार्यांचा सल्ला मानला म्हणून सौ चे प्राण तरी बचावले. आजकालच्या वैद्यकशास्त्रावर विसंबून राहिलो असतो तर काय अनर्थ ओढवला असता कल्पनाच करवत नाही.

माझे एक एक पाऊल शुभाशुभ मुहुर्तानुसार पडत असल्यानेच आज जो काही आहे तो आहे मी. म्हणजे अलिकडचे उदाहरण.. मध्यंतरी ऑफिसात आलेले गंडांतर

आमच्या अडिगबाबांच्या कृपेनेच टळले. परमपूज्य अडिग बाबा! तुम्हाला सांगतो, माझ्याबरोबरचा तो केळुस्कर अडकला चांगलाच. लाच पचवायलाही आध्यात्मिक ताकद लागते. बाबांच्या कृपेने मला तारून नेले. आणि पूज्य बाबांची अपेक्षा ती काय? तरी त्यांना सोन्याचे मृगाजिन बनवून दिले. आडिग महाराज मागे असताना कृपाप्रसादास काय कमी?

सांगण्यासारखे खूप काही आहे.

अनुभवासारखा गुरू नाही म्हणतात. मी स्वत: अनुभव घेतला आहे. उगाच सांगोवांगी नाही काही. दैवी चमत्कार जागोजाग होत असतात. ते पाहण्याची 'दृष्टी' हवी. 'देवाची करणी आणि नारळात पाणी' म्हणतात आमचे पूर्वज ते काय उगीच? उगाच प्रत्येक घटनेमागे विज्ञानाचा हात आहे म्हणावे, कुचकटपणे प्रत्येक बाबीमागचा कार्यकारणभाव शोधत रहावे, वर तोंड करून बहुसंख्यांस मान्य अशा श्रद्धांस 'अंधश्रद्धा' म्हणून हिणवत स्वत:च्या विज्ञाननिष्ठेचे दिंडोरे पिटणे.. हे पाखंडी बुद्धीनिष्ठांचे जीवितकार्य.. एकतर हे अल्पसंख्येत.. यांचा विश्वास लोकशाहीवर नाही, नाहीतर बहुमत असलेल्या बहुसंख्यांच्या श्रद्धास अंधश्रद्धा म्हणणे काय.. त्यावर कोरडे ओढणे काय नि आता तर 'अंधश्रद्धा निर्मूलन कायदा' वगैरे बनवणे काय.. इथवर मजल गेली नसती त्यांची. अर्थात कायदा करणे सरकारचे काम आहे.. तो लागू करत अंमलबजावणी करायलाच हवी असे बंधन सरकारवरच नसल्याने हा बिनदाताचा वाघ आम्हा बहुसंख्यांचे काही बिघडवू शकत नाही. तरीही अशा अश्रद्ध लोकांमुळे समाजमन गढूळ होत असते हे मात्र नाकारता येत नाही. आणि पुढे जाऊन हे पाखंडी आमच्या धार्मिकतेचा संबंध अंधश्रद्धांशी लावतात. बहुसंख्यांच्या विचारविश्वात नि भावभावनांत असे मधेमधे करत अश्रद्धांचे वावरणे हाच खरा श्रद्धेय

वातावरणासाठी अपशकुन मानायला हवा. यांच्यातील काहींच्या पापांचा घडा भरल्याने त्यांना त्यांच्या वेळेआधीच कालवश व्हावे लागले. कुणी म्हणालेही, तेवढाच चार पाखड्यांचा भुईवरील भार कमी झाला.. अर्थात या विवेकवाद्यांचा ज्या रीतीने अंत घडवून आणला गेला त्याबद्दल वाईट वाटले तरी आपल्या कर्माचे फळ याच जन्मी मिळते इतके जरी त्यांचे अनुयायी शिकले तरी खूप!

तर मुद्दा हा, जन्मापासून श्रद्धेची फळे चाखणारा मी, अंधश्रद्धेचा, खरेतर श्रद्धेचा मला अभिमान असणे स्वाभाविक आहे. तसा अभिमान बाळगणारे आम्ही समाजात बहुसंख्येने असता, तशी आम्हाला काय कुणाची भीती? बुद्धिभेद करणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवादी नि विवेकवादी इत्यादींपासून सावध रहावे, उगाच त्यांच्या कधीकधी तार्किक भासणाऱ्या सादरीकरणात कुणी फसू नये!

मी तर म्हणतो की यापुढे जागतिक श्रद्धादिन साजरा करण्यासाठी सरकारनेच पुढाकार घ्यायला हवा.. नव्हे.. सर्व टीकाकारांच्या नाकावर टिच्चून जागतिक अंधश्रद्धा दिनच साजरा करायला हवा!

# *नरो वा कुंजरो वा!*

वक्ता आणि स्पष्टवक्ता यांत फरक असतो म्हणे. अर्थात स्पष्टवक्तेणाची ही एक उतरंड असते. म्हणजे कुणी निरूपद्रवी स्पष्टवक्ता मोकळया मनाचा म्हणवला जातो, कुणी कौतुकाने स्पष्टवक्ता म्हणवला जाईल, त्यापुढच्या पायऱ्या गाठणारा फटकळ नि सर्वोच्च पायरीवरचा उद्धट म्हणवला जातो. वक्ता म्हणवणाऱ्याला या सर्वांशी काही देणं घेणं नाही असं ते स्पष्ट म्हणू शकतात. पण मी न वक्ता आहे ना स्पष्टवक्ता आहे हे मला जाणणारे स्पष्टपणे म्हणतीलच..

महाभारत कालीन सांस्कृतिक आदर्श म्हणजे प्रत्यक्ष धर्मराजाने नरो वा कुंजरोवा असं दिलेलं उत्तर. अगदी स्पष्टपणे! म्हणजे कोणास वाईट वाटायला नको.. पण तो धर्मराज. माझ्यासारख्या मामुली माणसास.. खरेतर 'इसम' म्हटला जाईल असल्या माणसास असला अलावन्स कोण देणार? त्यामुळे माझ्या अस्पष्टवक्तेपणास कोणी 'न बोलून शहाणा' म्हणतं, कुणी बोटचेपेपणा म्हणतं तर कुणी आतल्या गाठीचा म्हणतं तर कुणी अजून काही. पण कोणाचेही मन न मोडण्याचा माझा बाणा कुणी बघत नाही. मी तराजूच्या दोन्ही तागड्या एकाच लेव्हलवर आणून मत देत असेन तर न्यायदेवतेबरोबर माझे ही कौतुक नको व्हावयास .. डोळे मिटून नको हवे तर.. उघड्या डोळ्यांनी करा.. पण नाही. मी पडलो सामान्य प्रतीचा इसम. मला ते धर्मराजासारखं वलय नाही. म्हणून माझ्या अस्पष्टवक्तेपणाची हेटाळणीच होत आलीय नि पुढे ही होत राहणार हे स्पष्ट दिसतेय मला. पण माझा दृष्टिकोन तसा

लवचिक आहे. एकच गोष्ट पटवून घेण्याचा दुराग्रह नाही माझा. मला एकाच वेळी विरूद्ध गोष्टी पटू शकतात.. मग मी दोघांसही योग्य असे म्हणू शकतो. उगाच माझेच खरे असा हट्टाग्रह कशास? आणि संत सांगून गेले तो मी पणा सोडण्याची ही पहिली पायरी नव्हे का?

स्पष्टवक्तेपणाचे कुणी फायदे सांगतील.. सांगोत बापडे. पण अस्पष्टवक्तेपणाचे फायदे त्याहून कितीतरी जास्त आहेत हे जीवन शिक्षण आपण कधी देणार? उगाच स्पष्टवक्तेपणामागे लागून कोणाची मने दुखावणे मला मान्य नाही. अगदी गीर्वाण भाषेत, देवाच्या वाणीत 'मौनं सर्वार्थ साधनं' म्हटलं गेलं आहे. अगदी मौनच नाही पण अस्पष्ट वक्तेपण ही त्या दिशेने पुढे टाकलेले एक पाऊल मानायला हवे. आणि तसे करणे हे आपल्या प्राचीन संस्कृतीतील संस्कृताचा सुसंस्कृतपणे मान ठेवणे मानले जायला हवे. अर्थात कुणी माना अथवा न माना, मी माझ्या मनास पटेल असे अस्पष्टवक्तेपणाचे धोरण पहिल्यापासूनच स्पष्टपणे अवलंबत आलो आहे. त्यामुळे माझी प्रगती उत्तरोत्तर होत आली आहे व होत राहिल हे स्पष्टपणे सांगायलाच हवे! अर्थात जे काही आज आहे त्यास प्रगती म्हणावे की नाही याबद्दल कुणी स्पष्ट सांगितले नसेल, पण ती तशी आहे असे गृहित धरून पुढे जावे!

अगदी लहानपणापासून हे अस्पष्टवक्तेपण मी जपले आहे. शाळेत कोणी खोडी काढली तर त्या कुणाचे नाव मी माझे नाव न सांगण्याच्या अटीवर सांगत असे! तशी माझी स्पष्ट अटच असायची म्हणा ना! पुढे मी ती अस्पष्टपणाची सवय वाढवत विकसित केली. का ॅलेजात नि ऑफिसच्या कामात ही मी हे धोरण यशस्वीपणे

राबवले आहे. गोऱ्या साहेबाच्या आंग्ल भाषेत 'काॅलिंग स्पेड अ स्पेड' असा वाक्प्रचार आहे. आता स्पेड म्हणजे फावडं असेल ही.. पण फावडं हे फावडंच आहे कशावरून? ती कुदळ असू शकते! घमेलं ही असू शकतं! मला दृष्टीभ्रम होऊ शकतोच! तेव्हा मी त्या फावड्यास उगाच 'धिस इज द फावडा ॲंड नथिंग बट द फावडा!' असे छातीठोक का म्हणावे? अकबराच्या आवडत्या नि मेलेल्या पोपटाचे वर्णन ना ना तऱ्हांनी त्याच्या दरबाऱ्यांनी केले होतेच. त्यातील कोणाचेच काही चुकीचे नव्हते हे खरेच की नाही? तेव्हा ह्या 'नरो वा कुंजरो वा' धोरणास ऐतिहासिक व पौराणिक पार्श्वभूमीच नव्हे तर एक प्रकारचे 'सँक्शन' आहे!

पूर्ण डिटेल्समध्ये जाण्याची गरज नाही..

माझं म्हणणं इतकेच.. जगात अंतिम सत्य असे काही नसताना मी छातीठोक पणे एखादी गोष्ट कशी सांगू शकतो? कदाचित दुसरी बाजू ही खरी असू शकते. जे सत्य समजतो आपण ते असत्य ठरू शकते.. आणि या उलट ही होऊ शकते! आपण ऐकतो त्या कानांवर नि बघतो त्या डोळ्यांवर किती विश्वास ठेवावा वा विसंबून रहावे? दृष्टीभ्रमासारखाच श्रवणभ्रम ही होत असणारच! माझ्या या सवयीमुळे मात्र कायदेक्षेत्रात माझे नाव झाले आहे. मी साक्षीदार म्हणून फिर्यादीच्या पक्षासही उपयोगी पडू शकतो नि बचाव पक्षाच्याही! अशातून एखादे व्यावसायिक साक्षीदार बनण्याचे करियर घडवले जाऊ शकते हे मात्र माझ्या उदाहरणातून स्पष्ट दिसावे.

संत सज्जन म्हणून गेले, सत्य असत्यासी मन केले ग्वाही.. मी हे अगदी मनापासून मानतो. पण मुळात अंतिम सत्य काय हेच आपल्याला ठाऊक नसेल तर नक्की कशाला मनास ग्वाही करावे? आणि आज एखाद्या गोष्टीबद्दल, घटनांबद्दल.. विशेषत: ऐतिहासिक घटनांबद्दल.., एखाद्या व्यक्तीबद्दल वगैरे.. 'आपल्याला हवे ते,

तसे, नि तेच सत्य' अशी मांडणी करून घेता येत असेल तर हे सगळे उपद्व्याप कशाला? थोडक्यात काय तर आपल्याला हवे ते, हवे तसे, हवे तितके स्पष्ट बोलले तर 'राखावी बहुतांची अंतरे' हे धोरण सांभाळता येते ते ही सत्याची कास न सोडता! असे असताना उगाच फटकळपणा नि उद्धटपणा स्पष्टवक्तेपणाच्या नावाखाली का खपवावा? त्यापेक्षा 'हे ही ठीक' नि 'ते ही बरोबर' हे कुंपणावर बसणारे धोरण अंगीकारावे. म्हणजे कुंपणाच्या हव्या त्या बाजूस उडी मारता येते! माझ्या व्यावसायिक साक्षीदार म्हणून न्यायालयातील कारकीर्दीस इतकी वर्षे उलटून गेली. माझ्या धोरणाची फळे मी चाखतोच आहे. साक्षीदार म्हणून मला बचाव नि फिर्यादी अशा दोन्ही पक्षांकडून चांगलीच डिमांड आहे.. आणि मी डिमांड करेन इतके दाम मोजून घेता यावे इतकी माझी कमांडही आहे..


वयाच्या या ऐन तारूण्याच्या टप्प्यात आता एकच इच्छा आहे..

साक्षीदार म्हणून माझी नुकतीच चाळीस वर्षे सेवा झाली. आता राजकीय क्षेत्र साठीच्या ऐन तरूण वयात खुणावते आहे. कुठल्यातरी राजकीय पक्षात जावे, समाजसेवेचे नि देशोन्नतीचे स्वप्न साकारावे.. ही दोन्ही उद्दिष्ट्ये मी विविध नेत्यांच्या भाषणातून उचलली आहेत.. आणि तेच एखाद्या नेत्याचे व्यवच्छेदक लक्षण असते हे मला ठाऊक आहे. मला खात्री आहे, समाजास दिशा दाखवण्यासाठी माझ्यासारख्या तरूण तडफदार नेतृत्वाचीच गरज आहे..

आणि कुंपणावर बसायची सवय हा प्राथमिक अभ्यास आहेच!

आता अजून काय हवे?

# *आत्मचरित्र : एक डझनावारी मुद्देसूद चिंतन!*



(महनीय व्यक्तींची चरित्रे वा आत्मचरित्रे ही प्रेरणादायी असतातच. त्यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे खूप काही असते. पण त्यालाच समांतर काही आत्मचरित्रे प्रकाशित होत असतात. किंवा तशी फॅशनच आहे म्हणा. कित्येकदा काँट्रोव्हर्सी निर्माण करणे, खळबळ माजवणे, लेखक म्हणून मिरवणे इत्यादी विविधोद्देशी उपक्रम म्हणून हे केले जाते. सदर लेख हा फक्त अशा आत्मचरित्रांकडे उलट्या चष्म्यातून पाहण्याचा प्रयत्न आहे. कित्येक महान किंवा खरेतर रूढार्थाने लहान व्यक्तींचीही चरित्रे खूप काही शिकवून जातात. तेव्हा इतर आत्मचरित्रांच्या मूल्यमापनात राहतो तो मुद्दा एकच.. एखादे चरित्र/आत्मचरित्र लिहिण्यामागचा उद्देश कोणता?)

मी तसा अभ्यासू. पुस्तकी कीडा म्हणावा असा. लहानपणापासून पुस्तकात रमणारा. दिवसागणिक एकेका पुस्तकाचा फडशा पाडणारा. तेव्हा ह्या पुस्तकविश्वाबद्दल माझी निरिक्षणे असणे साहजिक आहे. तर विषय आहे

आत्मचरित्रे. मी जात्याच अभ्यासू वगैरे असल्याने सारे काही मुद्देसूद. तेव्हा हे आत्मचरित्रांविषयी मौलिक चिंतनही मुद्देसूद असले तर काय आश्चर्य? तेव्हा माझ्या या विषयावरील अभ्यास व चिंतनातून हाती आलेले हे काही मुद्दे. कुणी त्यास गुद्दे समजल्यास ती एक टायपोग्राफिकल एरर समजावी.

माझ्या मौलिक तात्विक चिंतनातून आत्मचरित्रांविषयी नोंद केलेली ही काही सामान्य निरीक्षणे: (डझनावारी आहेत कारण होलसेल मध्ये स्वस्त पडतात!)

***

लोक आत्मचरित्र का लिहितात?

मला आजवर आढळलेली एक डझन कारणे अशी:

१.मला काही सांगायचंय! पण ऐकायला कोणी तयार नाही.. सहन होत नाही पण सांगायचे तर आहे.. लिहून टाका आत्मचरित्र!

२. मी मोठा आहे पण च्यामारी! दुनियेला पटत नाही! काय करावे? लिहून टाकतो एखादे आत्मचरित्र!

३. माझ्याकडे सांगण्यासारखे खूप काही आहे. सुचते खूप. पण फिक्शन नि कथांना तेवढा 'भाव' देत नाही कुणी. मग काय! लिहून टाकतो आत्मचरित्र!

४. लहानपणापासूनच डायरी लिहितोय. अगदी जेवलो काय नि किती ते ढेकर किती नि किती वाजता दिले.. सारे डिटेलवार. या डायऱ्यांचे करू काय? लिहून टाकू आत्मचरित्र!

५. मी एक राजकीय (अभि)नेता आहे. दांडगा (नि दांडगाईचा) अनुभव आहे. जनांच्या कल्याणा आमच्या विभूती. लोकांना अनुभवाचा फायदा झालाच पाहिजे.. त्याचे साईड फायदे..

अ) लोकांना मी किती ग्रेट हे परत परत कळावे.

आ) त्या विरोधकांचा हिशेब परस्पर चुकता करावा.

इ) पुढील राजकारणाची सोय, ती ही राजमान्य पद्धतीने!

ई) झालंच तर धुरळा उठवून देता येईल. मग बेस्ट सेलर.. बँक अकाऊंटात पांढरा पैसाही येण्याची सोय होईल.

उ) पुढे मागे इतिहासात नाव यायचे असेल तर आजच तयारी केली पाहिजे. पैसा कमावून भागतं थोडीच. नाव पण पाहिजेच!

ऊ) लिहिणारे घोस्ट रायटर तयार आहेत. त्यांना काम मी नाही तर कोण देणार? विरोधकांना ही रोजगार निर्मिती नाही दिसायची.

६. मी एक अभिनेता आहे. आता याहून वेगळे काही कारण हवे का बेस्ट सेलर लिहायला? एक अभिनेता बारा भानगडी असा सिनेमा काढून कुणी पैसा कमावण्यापेक्षा आपणच कमवावा की नाही?

७. माझ्या आयुष्यात रोमांचकारी क्षण इतके आले. लोकांना कळायला हवेच.. हा 'क्ष' नामक इसम नुसता इसम नव्हता तर 'क्ष' हे एक 'रिस्पेक्टेबल' व्यक्तिमत्व आहे. आत्मचरित्राशिवाय कसे कळणार कोणाला?

८. मोठी माणसं आत्मचरित्रे लिहितात तर मग मी ही लिहिले तर माझी गणती 'मोठी माणसं' मध्ये होईलच.

९. 'मी कसा झालो' हे दुसऱ्या कुणी 'मी असा कसा झालो' सांगण्याच्या आत सांगितलेच पाहिजे मलाच!

१०. पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शक, दीपस्तंभ म्हणून माझे हे आत्मचरित्र उपयोगी पडेल.

११. लिहिल्यावाचून राहवत नाही म्हणून.

१२. रिटायर झालो. पेन्शनीत निघालो. हाताला काम नको? बसलो लिहायला. तितकीच वर्ष सहा महिने निघून जातील.

***

आत्मचरित्र लिहायचेय.. ह्या घ्या सोप्या टिप्स..

१. लहानपणापासून तयारी करा. परदेशात ऑलिंपिक्सची तयारी पाळण्यात पोर असताना केली जाते. तेव्हा लहानपणापासून विचार करून ठेवा.. मी आत्मचरित्र लिहिणारच! म्हणजे तशा पद्धतीने आपण डेटा गोळा करू शकू. अर्थात हे एक ऑथेंटिसिटी साठी.

२. अपयशामागून आलेल्या यशाला जास्त किंमत असते. लहानपणीच अपयशी झालात तर पुढे जे काही अचिव्ह कराल ते जास्त काँट्रास्ट बॅकग्राउंडमुळे उठून दिसेल. तेव्हा शाळेत नापास झालात? वर्गाबाहेर जावे लागले? उनाडपणा केलात? खचून जाऊ नका. उज्ज्वल आत्मचरित्राचा पाया तुम्ही रचला आहे हे ध्यानात घ्या.

३. लहानपणी हे सारे केले नाहीत? काही हरकत नाही. माणसाला देवाने एक गोष्ट दिली आहे जी अन्य प्राण्यांकडे नाही.. कल्पनाशक्ती. तिच्या जोरावर ही कसर भरून काढा.

४. शाळेतून कॉलेजात हे संक्रमण महत्वाचे. तुम्हाला आपली कुठली प्रतिमा उभी करायची हे ठरवून घ्या. तेव्हा कॉलेजलाईफ बद्दल नोंदी तर करून ठेवाच पण हवे ते बदल आपल्या सोयीनुसार करता येतात हे विसरू नका.

५. प्रेमकथा हा अजरामर विषय आहे. आजवरच्या इतिहासात अजूनही कुणी कंटाळले नसेल असा हा विषय आपल्या प्रतिमेनुसार वापरा. म्हणजे तुम्ही एखादे अभिनेता वगैरे असाल तर रंगेल प्रतिमा चांगली दिसेल. पण नेता असाल नि प्रत्यक्षात रंगेल असलात तरी तशी प्रतिमा जनमानसातील इमेजला काट देईल. तेव्हा त्याप्रमाणे मजकूराची आखणी करा.

६. आपल्या सहकाऱ्यांबद्दल काय लिहायचे याचा विचार नीट करा. सर्वप्रथम आत्मचरित्राचा उद्देश काय यावर हे अवलंबून आहे हे ध्यानात घ्या. तेव्हा राजकीय आत्मचरित्रांत हे अत्यंत महत्वाचे हे ध्यानी घ्या.

७. आपल्या व्यावसायिक आयुष्याबद्दल ही प्रतिमा निर्मितीचा विचार करा. प्रसिद्ध व्यक्तींनी आपल्या संघर्षाबद्दल नि त्यातून मारलेल्या भरारीबद्दल लिहिणे अपेक्षित असते. तेव्हा सरळसोट यशाच्या शिखरावर चढू नका. अप्रसिद्ध व्यक्तीही या मार्गे प्रसिद्ध होऊ शकतातच. तेव्हा हा आत्मचरित्राच्या यशाचा शुअर शॉट मार्ग आहे हे ध्यानात घ्या.

८. प्रसिद्ध व्यक्तींनी आपल्या आत्मकथनातून गौप्यस्फोट करणे आवश्यक आहे. तेव्हा असला गौप्यस्फोटात्मक मजकूर तयार ठेवा. कधीही असल्या मजकुराची पूर्ण वाच्यता प्रकाशनाआधी करू नका. फक्त जातायेता हिंट पेरत रहा.

९. गौप्यस्फोस्टासाठी काही नसेल तर प्रथितयश पण अंडरकव्हर लेखकांची फौज उपलब्ध असेलच. त्यातील कोणाला सनसनाटी पण विश्वासार्ह वाटणाऱ्या घटना लिहिण्यास मदतीला घ्या.

१०. लक्षात घ्या, भाषा हा घटक लेखनात महत्वपूर्ण आहे. आत्मचरित्रातील घटना विश्वासार्ह वाटण्यासाठी त्यात चिंतनात्मक मजकूर पेरा. आयुष्यातील काही सर्वज्ञात सत्ये असली तरीही ती नवीन वाटावीत अशा ललित रूपात सांगितलीत तर तुमची इतर काही जास्त महत्वपूर्ण असत्ये सहज खपवून आपले इप्सित साध्य करता येईल.

११. आपले वय झाले असेल तर 'उरलो उपकारापुरता' हा आव सहजपणे येईल असे पहा. आशीर्वादात्मक मजकुराची पेरणी करा. 'नमस्कारासाठी वाकावे असे पाय दिसत नाही' म्हणणाऱ्यांना 'आशीर्वाद देण्यासारख्या पाठीच हल्ली दिसत नाहीत' हे सांगावयास कचरू नकाच, सोबत पुढील पिढीस मार्गदर्शनासाठी आपण सदैव तत्पर आहात हे सांगावयास विसरू नका.

१२. सामान्य माणसांपैकी कुणास आत्मचरित्र लिहावयाची लहर आली तर त्याने सारासार विचार करावा. म्हणजे आपल्या आयुष्यात कितीही खस्ता खाऊन आपण वर आलो असलो तरी आपल्याला सेलिब्रिटी स्टॅटस नसल्यास आपली निवृत्तीची पुंजी नाहक पुस्तक प्रकाशनात खर्ची पडू शकते हे ध्यानात ठेवा. पुस्तक लिहून कुणी सेलिब्रिटी होत नाही. आधी सेलिब्रिटी.. मग स्टॅटस.. मग आत्मचरित्र..

हा क्रम विसरू नका. बाकी तुम्हाला काय सांगायचंय हा मुद्दा तसा दुय्यम किंवा खरेतर तिय्यम महत्वाचा.

***

आपले आत्मचरित्र बेस्ट सेलर कसे होईल?

पुस्तक तर छापले. गठ्ठे येऊन पडलेत. त्यांचा खप नसेल तर? जागा अडवणाऱ्या पुस्तकांना 'कन्या सासुरासी जाये' म्हणत वाचकांकडे किंवा खरेतर खरेदीदाराकडे बिदाई करण्यासाठी टिप्स..

१. कुतूहल निर्मिती: कुतूहल हा जिज्ञासेचा पाया आहे. तेव्हा तुम्ही ऑलरेडी सेलेब्रिटी असाल (आणि सेलेबल आत्मचरित्रासाठी ती पूर्व अट आहे) तर मिळेल तिथल्या व्यासपीठावर आत्मचरित्राबद्दल काहीबाही बोलत रहा. कुतूहल चाळवणे ही वातावरण निर्मितीची पहिली पायरी आहे. पुस्तकाची हवा निर्माण करणे महत्वाचे. सिनेमावाले जाहिरातीसाठी वेगळे बजेट बनवतात. पुस्तकातून आर्थिक फायदा हवा असेल तर आणि लेखक म्हणून प्रतिष्ठा हवी असेल तर पुस्तकाचा खप महत्वाचा. तेव्हा विविध ठिकाणी चर्चा घडवून आणा. आजच्या जमान्यात विविध समाजमाध्यमे असल्या कंटेटच्या शोधात असतातच. त्यांचा फायदा उठवा. अर्थात नंबर ऑफ व्ह्यूज आणि लाइक्स आधीच निश्चित करून ठेवा.

२. कॉंट्रोव्हर्सी क्रिएशन: हा वातावरण निर्मितीतील पुढचा टप्पा आहे. कुतूहल निर्मितीनंतर आपल्या जुन्या दिवसांबद्दल काहीतरी शेरे नि कुणावर तरी ताशेरे ठोका.

३. सरोगेट जाहिराती: प्रत्यक्ष जाहिराती महागात पडतात असे वाटत असेल तर मुलाखती वगैरे कार्यक्रमांना उपस्थित रहा नि आपली मते मांडा. ती मांडताना 'माझ्या आत्मचरित्रात हे मी अधिक विस्ताराने लिहिलेय' वगैरे सांगत रहा.

४. आरोप प्रत्यारोप: ही काँट्रोव्हर्सीच्या पुढची पायरी आहे. जुन्या नव्या घटनांबद्दल संदिग्ध भूमिका घेत कोणाकोणावर आरोप करत रहा. कुणी जास्त खोलात गेले तर 'पुस्तकात वाचाल लवकरच' सांगून फुकटात जाहिरात करून घ्या.

५. प्रसिद्धीपूर्व नोंदणी करा. 'सवलतीत पुस्तके' याबद्दल आकर्षण असतेच. लोकांकडे पैसे नसतात असे नाही पण ते पुस्तक खरेदीत घालवण्याहून कुठल्याशा मा ॅलमध्ये खाण्यापिण्यात खर्च करणे त्यांना जास्त पटते. तेव्हा पन्नास टक्के वगैरे सवलत देऊन प्रकाशनपूर्व नोंदणी करून घ्या. वाचलेल्या पन्नास टक्क्यात लोक समाधानाने अजून काही खातील पितील.

६. पेपरात एखादे प्रकरण छापून आणा. अर्थात ज्यात वादविवादाची शक्यता आहे असाच भाग छापून येऊ द्या. स्वत:हून पेपरवाले छापणार नसतील तर जाहिरात म्हणून छापून येऊ द्या. फक्त तसा उल्लेख न करता. पुढे कमाई करायची असेल तर थोडा हात सैल सोडावाच लागेल.

७. एखाद्याची जाहीर माफी मागा. साधेपणा आणि नम्रतेसारखी सेलेबल गोष्ट नाही. वाकून नमस्कार करा. आपल्याहून लहान कुणास दुखावले असेल त्याची या निमित्ताने जाहीर माफी मागा. तुम्ही राजकीय व्यक्ती असाल तर हे तुमच्यासाठी सोपे तर आहेच पण करियरसाठीही आवश्यक आहे. पुस्तकाचा खप हा अधिकचा फायदा!

८. ॲक्टिंग कोर्सेस जा ॅइन करा. अभिनेत्यांस तर ॲक्टिंग येतेच, नेत्यांनाही ते विविध ठिकाणी उपयुक्त ठरते. तेव्हा अभिनयाचे व्यवस्थित प्रशिक्षण घेणे फायद्याचे आहे. पुस्तकात याचा उल्लेख करू नका परंतु पुस्तकासंबंधी विविध समारंभात आपल्या अभिनय कौशल्याचा उपयोग करा.

९. अतिशय उच्च पातळीवरची इंग्रजीत चर्चा घडवून आणा. मजकुराहून भाषा महत्वाची. चर्चेच्या कंटेटहून ती इंग्रजीत आहे हा भाग महत्वाचा. सर्वदूर अपील करायचे असेल तर वाघिणीच्या दुधाहून पौष्टिक अजून काही नाही.

१०. पहिली आवृत्ती पन्नास पुस्तकांची काढा. जर पुस्तकाच्या प्रकाशनाला लोक येतील अशी खात्री असेल तर पन्नासाऐवजी शंभर किंवा दोनशेची काढून ती हातोहात संपवा. म्हणजे लगोलग दुसरी आवृत्ती काढता येईल. ती देखील अशीच मर्यादित काढून तसा उल्लेख जाहिरातीत आवर्जून करा. अर्थात आवृत्ती किती पुस्तकांची याचा नव्हे तर कितवी आवृत्ती याचा उल्लेख करा. पंधरावीस दिवसात अशा दहा आवृत्त्या निघाल्या की पुढे पुस्तक आपोआप हिट होऊन बेस्ट सेलरच्या यादीत जाईल.

११. प्रकाशन सोहळा: हा अत्यंत महत्वाचा. प्रकाशक जरी तो घडवून आणत असला तरी शेवटी खिसा खाली लेखकाचा होत असतो. तरीही इन्व्हेस्टमेंट म्हणून हा सोहळा अत्यंत गरजेचा आहे हे विसरू नका. आपल्याबद्दल बरे बोलतील अशाच कोणाला अध्यक्ष म्हणून बोलवा. त्याचबरोबर साइड बाय साइड पुस्तकातील प्रकरण वाचन, कुणाची संबंधित मुलाखत वगैरे कार्यक्रम ठेवा. अगदी गाणे किंवा विनोदी कार्यक्रम पण चालतील पण प्रकाशनाच्या वेळी व नंतर काही दिवस चर्चेत रहा.

१२. प्रकाशन पश्चात, पेपर किंवा टीव्हीवर आपल्या लिखाणावर कुणी जोरदार हल्ला करण्याची तजवीज करा. त्याला मग तुम्ही उत्तर द्या. प्रसिद्धी मिळवण्यासाठी याहून सोपा उपाय नाही. जेवढे तुम्ही चर्चेत राहाल तितकाच पुस्तकाचा खप वाढेल.

***

इतके सगळे लेखकांना सांगून झाल्यावर वाचकांनी काय घोडे मारलंय? त्यांना ही काही टिप्स देणे जरूरी आहे!

आत्मचरित्रे कशी वाचावीत?

१. मनोरंजनासाठी आत्मचरित्र वाचा.

२. जाता जाता लेखक काही जीवनविषयक भाष्य करून जात असेल तर तो एक ॲडिशनल फायदा!

३. कथाबाह्य पण सुरस नि चमत्कारिक कथन असणारे साहित्य म्हणून आत्मचरित्रांचे महत्व जाणा.

४. जगात फार थोड्या बाबी गंभीरतेने घ्याव्या अशा असतात. आत्मचरित्रे यास अपवाद कशी असतील?

५. कथानायक अर्थात लेखकाचे प्रत्यक्ष आयुष्य व आत्मचरित्रात कथन केलेले आयुष्य यांचा पडताळा पाहात बसू नका. आपला वेळ अमूल्य आहे हे ध्यानात ठेवा.

६. पहिले नि शेवटचे प्रकरण वाचून घ्या. मधला मजकूर वाचला नाहीत तरी चालेल. पुस्तक प्रसिद्धीस पावले तर त्यावर कुठेही मतप्रदर्शन करण्यास तयारी हवीच. आणि पान न पान वाचावयास हे काही क्रमिक पाठ्यपुस्तक नव्हेच!

७. एकाच जाॅनरची म्हणजे उदा. राजकारण्यांची, नटनट्यांची वगैरे.. एकाच वेळी दोन तीन पुस्तके वाचून होऊ शकतात. कारण कदाचित मजकूर सारखाच असू शकतो. घोस्ट रायटर ही एकच असण्याची शक्यता जास्त आहे.

८. आत्मचरित्रात 'मी' 'मला' 'माझे' असले शब्द वारंवार येणारच. ते वाचून बिचकू वा दचकू नका. आत्मकथनाचा 'मी' हाच आत्मा आहे हे समजून घ्या.

९. आत्मचरित्रकाराशी कधी गाठ पडणार असेल तर त्यांच्या पुस्तकाचे किमान शीर्षक तरी वाचून जा. आतील काही मजकुरावर नजर फिरवता आली तर अधिक बरे म्हणजे त्या साहेब मजकुरांवर चांगले इंप्रेशन पडेल.

१०. वाचन करताना अगदीच वाहून जाऊन चरित्रनायकाच्या पावलावर पाऊल टाकायचा निश्चय करू नका. चरित्रनायक स्वत:ही इतका गंभीरपणे विचार करत असण्याची शक्यता कमीच आहे.

११. पुस्तकाची नावे व लेखक या जोड्या नीट ध्यानात ठेवा. आपण वाचलेले असो की नसो, चारचौघांत पुस्तकांची नावे लेखकाच्या नावासह घेतल्यास आपला भाव वधारतो हे लक्षात घ्या.

१२. वरीलपैकी सूचनांचे पालन ऑप्शनल आहे. आपल्याला हवे तर पूर्ण पुस्तकही वाचू शकता.

जाता जाता..


लवकरच 'प्रकाश प्रकाशना'कडून माझे 'विद्वान सर्वत्र पूजयेत..' हे आत्मचरित्र प्रसिद्ध होत आहे. उगाच स्वत:ची टिमकी वाजवायची सवय नि आवड मला नाही. पटत ही नाही ते. फक्त आजवरच्या ह्या 'विद्वत्ता' क्षेत्रातील प्रवासात आलेले अनुभव नि जवळच्या म्हटलेल्या कुणी यांनी दिलेला धोका वगैरे बद्दल लिखाण असून त्यातून लोकांना बरेच काही शिकता येईलसे वाटते. हे ही सांगत आहे कारण विषय निघाला म्हणून. उगाच जाहिरात वगैरे करण्याची न मला सवय आहे न गरज. पुस्तक प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहेच. यथावकाश यथासांग प्रकाशन होईलच. तोवर प्रतीक्षा करा..



# डॉ. नितीन मोरे यांची ४९+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.















डॉ. नितीन मोरे
खटपट्या
लटपट्या
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास



मिशन
ब्र
डॉ नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री
नाटक


डॉ. नितीन मोरे
तिसऱ्या घाताची गंमत!
बालनाटिका


डॉ. नितीन मोरे
दोन अंक
प्रेमाचे


एका डॉक्टरची
कोविडकथा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

चक्रमादित्य भाग १ ते ५


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0






डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३
आलू.. हीरो.. अभांड..इ..



डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे
आणि


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



राग दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाथ जमूरेनाथ



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
घरात



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो
ऐका



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची
'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता २ डझन)

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे पन्नासावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांनी पुस्तकांचे अर्धशतक पूर्ण केले आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ.

मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे **(५०)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३). श्रीराम काळे (२) शैलेश पुरोहित(४) बी बी देसाई(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)